प्रकरण ४

Chapter-4

# राजन गवस यांच्या कादंब-यातून प्रकट झालेले दृष्टिकोन

प्रकरण ४ :

# राजन गवस यांच्या कादंब-यातून प्रकट झालेले दृष्टिकोन

अ) जीवनविषयक दृष्टिकोन

१) माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी

२) मूल्यविषयक दृष्टिकोनातील देशीयता

आ) स्त्रीविषयक दृष्टिकोन

इ) शैक्षणिकविषयक दृष्टिकोन

# प्रकरण ४ : राजन गवस यांच्या कादंब-यातून प्रकट झालेले दृष्टिकोन

या प्रकरणात राजन गवस यांच्या कादंब-यातून प्रकट झालेल्या विविध दृष्टिकोनाचा विचार केला आहे

## (अ) जीवन विषयक दृष्टिकोन :-

साहित्य निर्मितीचे मूलभूत प्रयोजन मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हेच असते. समाजाचे आणि माणसाचे संबंध कधी परस्परपूरक तर कधी परस्परविरोधी असतात. साहित्याद्वारे या संबंधात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला जातो आणि म्हणून साहित्य व समाज यांचा संबंध हा परस्पर व पूरक, पोषक असावा अशी अपेक्षा असते. अशावेळी लेखकाची भूमिका महत्त्वाची असते. समाजात वावरणा-या सामान्य माणसाप्रमाणेच लेखकावर ही सामाजिक जवाबदारी अधिकच आहे. अशावेळी साहित्य निर्मिती करताना समाज सापेक्षतेमुळे लेखकाला जबाबदारीपूर्वक लिहिणे, गरजेचे होते. लेखनात जीवनविषयक जाणिवा येऊन वाचकांपर्यंत त्या पोहचल्या पाहिजेत. ज्यामुळे या वाचकांच्या जाणिवा ही समृद्ध झाल्या पाहिजेत.

कादंबरी हा एक सामाजिक दस्तावेज मानला जातो. कादंबरीलेखन करताना समाजाची जबाबदारी लक्षात ठेवून समाजातील संस्कृती जोपासण्याचे कार्य ही करावे लागते. ही कादंबरी लेखनाची भूमिका कादंबरीच्या संदर्भात आवश्यक मानली जाऊ लागली. समाजाची सांस्कृतिक गरज म्हणून कादंबरी हा प्रकार लिहिला जातो. यातून माणूस, समाज आणि काळ यांचा विचार केला जाऊन लेखकाला देशकाल परिस्थिती समजून संस्कृतीचे भान ठेवावे लागते.

कादंबरी लेखनाद्वारे लेखक समाजाची जबाबदारीच पार पाडत असतो. आपली संस्कृती जपण्याची एक महत्त्वाची जबाबदारी लेखकावरच असते. त्याबद्दल

डॉ. किशोर सानप, "समाज व्यवस्थेत जगताना कादंबरीकाराचे भोवतालच्या परिसराशी आणि पर्यावरणाशी अंतर्मुख आणि बहिर्मुख असे बहुपदरी नाते असावे लागते. समाज हेच कादंबरीकाराच्या अनुभवाचे साक्षात आणि जिवंत केंद्र असते. कादंबरीकाराला व्यक्ती आणि समाजाचे पूरक आणि विरोधी संबंध खोलात शिरून सूक्ष्मपणे तपासावे लागतात आणि त्यांचा कार्यकारण संबंध कादंबरीत व्यक्त करावा लागतो." (१)

कादंबरीलेखन ही वैयक्तिक पातळीवर घडणारी घटना असून त्यामध्ये लेखकाची नैतिकता ही महत्त्वाची असते. कादंबरी लेखनात समाज, संस्कृतीला महत्त्व असते. कारण या सामाजिक वातावरणातूनच कादंबरी ही जन्माला येत असते. लेखकावर झालेले संस्कार त्याच्या लेखनातून प्रकट होतात तसेच त्याचे मूल्यविचार ही दिसून येतात. कादंबरी लिहिण्याच्या प्रयोजनातूनच कादंबरीकाराची नैतिकता व्यक्त होत असते. रा.भा.पाटणकर यांच्या मते, "कलाकृती जीवनाला जितक्या जास्त गंभीरपणाने सामोरी जाते तितकी तिच्यातली नैतिक बाजू महत्त्वाची होत जाते." (२) कादंबरीकाराची असलेली जीवनदृष्टी ही त्याच्या नैतिकतेतून दिसत असते. भालचंद्र नेमाडे यांनी मराठी कादंबरीत नैतिकतेचा विचार मांडला. त्यांनी, "नैतिकता म्हणजे लेखकाचा मूल्यविचार." (३) असा अर्थ ही दिला. कादंबरी लेखनात कादंबरीकाराची स्वत:ची नैतिक भूमिका असते. कारण या नैतिकतेतूनच कादंबरीकाराची खरी ओळख होते. कादंबरीच्या लेखन प्रक्रियेत नैतिकतेला महत्त्व असते. "कादंबरीत भोवतालच्या समाजातील अंतर्गत आणि बहिर्गत असे आशयद्रव्य असते. हे आशयद्रव्य कादंबरीकाराच्या नैतिकतेसह कादंबरीतून आविष्कृत होत असते." असे डॉ. किशोर सानप सांगतात. (४)

लेखकाची नैतिकता म्हणजे लेखकाचे वैयक्तिक मूल्यविचार हे वेगवेगळे असतात. नेमाडे कादंबरीकाराच्या या भूमिकेबद्दल लिहितात, "इतर कोणत्याही साहित्यकारापेक्षा कादंबरीकाराचे अस्तित्व समाज-सापेक्ष असते. अर्थातच समूहाच्या जाणिवा व्यक्त करणे त्याबरोबरच आलेच..... कादंबरीचे सामाजिक दस्तऐवज म्हणून असलेले महत्त्व वादातीत आहे. ही सामाजिक प्रक्रियांची नोंद करताना कादंबरीकाराला स्वत:वर कोणती तरी

नैतिकता लादून घ्यावी लागते; कारण अशा वैयक्तिक मूल्यमापनाच्या काहीतरी व्यवस्थेशिवाय कादंबरीकाराला समाजाच्या अंत:स्तरापासून सुरू होऊन बहिस्तरावर लौकिक स्वरूपात प्रकट होणा-या प्रक्रियांचा परस्परसंबंध, सापेक्ष मूल्यमापन करता येत नाही. हे वैयक्तिक नैतिकतेचे साधन ज्याला सापडत नाही, तो इतर वाङ्मय प्रकार तरी हाताळतो किंवा तरीही कादंबरी लिहिलीच तर ....न-नैतिक कृती निर्माण होतात." (५) म्हणजेच कादंबरीकार कोणती तरी विशिष्ट अशी भूमिका घेऊन कादंबरी लिहित असतो. कादंबरीमध्ये समाजाच्या अंत:स्तरापासून बहिस्तरापर्यंतचे प्रकटीकरण लेखकाच्या नैतिक भूमिकेतून होणे आवश्यक असते. हे प्रकटीकरण राजन गवस यांच्या कादंब-यातून झालेले आहे.

नैतिकता हा लेखकाचा वैयक्तिक मूल्यविचार असून साहित्यात गृहीत धरलेल्या नैतिकतेचे स्वरुप भिन्न असते. लेखकाची नैतिकता आणि समाजातील नैतिकता ही निश्चितच वेगळी असते. समाजातील भ्रष्ट वातावरणात लेखकाच्या नैतिकतेचा विरोध केला जातो. परंतु खरा लेखक त्याला न जुमानता आपल्या मूल्यविचारांना अधिक काटेकोरपणे प्रकट करीत असतो. उदा. राजन गवस यांच्या 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यातून दिसून येणारी त्यांची नैतिक भूमिका. मोहन बल्लाळ, शंकर, दिलावर, चेअरमन, रघू, कबीर या सर्वांतून लेखकाची नैतिक भूमिका आपल्या समोर येते. कादंबरीत आपले विचार मांडण्यासाठी लेखकाला अशी स्वतंत्र पात्रे निर्माण करावी लागतात.
राजन गवस यांच्या कादंब-यातील चेअरमन, रघू, कबीर, मोहन बल्लाळ, शंकर, दिलावर ही पात्रे लेखकाची भूमिका मांडत समाजातील भ्रष्टता समोर आणतात. समाजाच्या विविध क्षेत्रातील ननैतिकता दाखवत आपल्या प्रतिक्रिया मांडतात. ही पात्रे या समाजाच्या प्रत्येक क्षेत्रांतील भ्रष्ट, घाण वातावरणापासून स्वत:ला अलिप्त ठेवत असतात. उदा. 'कळप' मध्ये रघू सांगतो,"अशा लोकांना संमेलनाची गरज असते. म्हणूनच ते एवढया लोकांना मूर्ख बनवून मिरवून घेऊ शकतात. त्यांच्या माफक अपेक्षा असतात. लोकांनी आपल्याला साहित्यिक म्हणावं, पेपरात नावं छापून यावीत. अशा संमेलनातून हे पूर्ण होतं. नाही तर

ह्या बद्रीनाथ भादवणकरचा आणि साहित्याचा संबंध काय ? मला तर नेहमी तो फाशी द्यायला निघालेल्या मांगासारखा वाटतो." (पृ. ८६-८७)अशा वातावरणातही प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करत असतात. आपली नैतिकता जपतच आपले जीवन अर्थपूर्ण करत जगण्याची धडपड करणारे असतात. गवस यांची ही पात्रे समाजाशी संघर्ष करत शेवटी हतबल झालेली मात्र दिसतात. या समाजाच्या भ्रष्ट प्रवाहात जीवन संघर्ष करत ते नैतिकता जपणारे मात्र समाजाच्या या सशक्त घाण, भ्रष्ट प्रवाहासमोर निर्बळ ठरतात. उदा. 'कळप' कादंबरीत रघू म्हणतो,

"किती छान! आपण जनावरांच्या गोट्यात आलो.
इथं महाजनही असणार नाही आणि सनमाडीकरही." (पृ. ३९४ )

समाज आणि व्यक्ती यांचे परस्परसंबंध व्यक्तीला वर्गीय आणि जातीय चौकटीत न अडकून राहता, त्यांच्या न्याय जगण्याची किमान पातळी राखता येईल असे असणे आवश्यक आहे. परंतु शोषणाच्या अनेक व्यवस्था धर्म,श्रध्दा यांच्या आधाराने निर्माण करत विशिष्ट जातिवर्गाचे हितसंबंध रचणारी आपली सामाजिक व्यवस्था यामध्ये असंख्य व्यक्तींची आयुष्ये नागवली जातात. राजन गवस यांनी आपल्या कादंब-यांच्याव्दारे सामाजिक व्यवस्थेतील अनेक स्तरांवर कार्यरत असलेली ही शोषणाची व्यवस्था उघडी करुन दाखवत या सामाजिक व्यवस्थेविरुध्दचा आपला आवाज प्रकट केला आहे. समाज आणि व्यक्ती यांच्या परस्परसंबंधात व्यक्तीचे न्याय जगणे, त्याचे माणूस म्हणून जगता येणे जितके आवश्यक तितकेच समाजाचे निरोगीपण टिकून राहणे ही आवश्यक आहे. यातील परस्परसंतुलनाची अनिवार्यता त्यातून सतत व्यक्त होते. 'चौंडकं','भंडारभोग' मधून धर्माआडच्या मुखवट्याखाली व्यक्तींची शोषित अवस्था ते व्यक्त करतात. 'कळप' , 'तणकट' यामधून राजकारण,गटबाजी,हेवेदावे,स्वार्थ,स्पर्धा,भौतिकतेची वाढती लालसा यातून सडत जाणारी विविध पातळ्यावरील सामाजिक व्यवस्था ते उघड करतात.कोणत्याही रूढ, पारंपरिक चौकटीतील मूल्यविचारापेक्षा व्यक्तीच्या न्याय जगण्याला,त्याच्या प्रामाणिक अशा माणूसपणाच्या अस्तित्वाला सार्थ करु पाहणारी, साकार करु पाहणारी सामाजिकता

त्यांच्या मूल्यविचारात अभिप्रेत आहे.

त्यामुळे रूढ,पारंपरिक समाजमान्य नैतिकता ओलांडून ते व्यक्तिसापेक्ष अशी नैतिकताही अभिप्रेत करतात. अन सामान्य माणसाच्या जगण्याला केंद्रस्थानी ठेवत सर्वसामान्य साधीसुधी माणसे माणुसकीची नैतिकता कशी जोपासतात, ते सांगू पाहतात. राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये सामान्य माणसाला महत्त्व दिलेले आहे. ते 'तणकट' मध्ये समाजाच्या विविध समूहाच्या भावभावना व्यक्त करताना समूहजीवना बरोबर त्यातील सामान्य माणसाला केंद्राशी ठेवलेले आहे. सरळ साधे जीवन जगणारे लोक गवस यांना अधिक प्रामाणिक वाटतात. उच्चवर्णीय सुशिक्षित लोकांमध्ये अ-नैतिकता, मूल्यांचा -हास होत असलेला पाहून सामान्य लोकांचे जगणे अधिक कुतूहलाचे, जाणिवेचे झालेले आहे. गवस यांचे नायक या सामान्य लोकांना श्रेष्ठ मानतात.'धिंगाणा' मधील म्हातारा थळूआजा हा खेडेगावात राहणारा, अशिक्षित असूनही नीतिमत्तेने जगण्याच्या आग्रही असतो.'कळप' मध्ये रघूची आई, बायना वहिनीच्या अनैतिक संबंधांना स्वीकृती देऊन बायनाकडे एक माणूस म्हणून पाहत तिच्या भावभावनांचा विचार करताना दिसते. तेथे 'तणकट' मध्ये राणे हे उच्च समाजातील असून माणुसकीला धरून वागणारे असतात. त्यामुळे नैतिकतेचा विचार हा वर्गीय चौकटीत अडकून राहात नाही. तर थळूआजा ही मानवी मूल्यांचा विचार करणारा असते.

'भंडारभोग' मध्ये तायाप्पाच्या वाट्याला आलेले आयुष्य अंधश्रध्देच्या अन विशिष्ट जातिवर्गाच्याशोषणाने.असलेल्या समाजव्यवस्थेत असले तरी तायप्पा अन रत्नव्वा यांच्या संबंधातील प्रामाणिकतेला तेथे महत्त्व आहे. सुली आणि बबन्या यांच्या नात्यातील, सुलीच्या प्रेमातील सच्चेपणा आणि बबन्याचे तथाकथित विशिष्ट जातिवर्गातील संधीसाधूपणा यात देवदासींच्या आचारधर्माविरुध्द वागणा-या सुलीबद्दलची न्याय हक्काची लेखकाची भावना कादंबरीत प्रकटते. म्हणजे रुढ सामाजिक व्यवस्था अन् व्यक्तीच्या न्याय हक्काच्या बाजूने लेखक आपला मूल्यविचार प्रकट करतो. तसेच 'कळप' मध्ये कमळाबाई

,गोजाबाई ,बेबी या जोगतिणींचे जगणे पाहून सामाजिक चळवळी करणारे सनमाडीकर सर सांगतात," हेच तर व्यवस्थेचं वैशिष्ट्य! त्यांना कळतं आपल्याला बळी दिलंय. आपल्या आयुष्याचं मातेरं केलंय. पण त्यांच्या मनातला संताप उफाळून वर येऊ नये म्हणून त्यांच्या डोक्यावर यल्लूआईला बसवलंय.त्यांचा संताप आपोआपच देवाच्या ओझ्याखाली दबून जावा. म्हणजे शोषणकर्ता जेव्हा शोषणाची यंत्रणा उभी करतो तेव्हा तो आपल्या बचावाच्या भिंती पहिल्यांदा गच्चपणे उभ्या करतो. त्या संरक्षण यंत्रणा असतात. ती संरक्षण यंत्रणाच अशी भीतिदायक असते की शोषित त्यातच खलास होतो. ह्यांनी घरात आपल्या बायका पडद्यात ठेवायच्या आणि ह्या बायकांना पिळून काढायचं. हा कुठला न्याय? व्वारे आमचा देश! आमची संस्कृती !" हळूहळू सरांचा आवाज आणि स्वगत वाढाय लागलं.(पृ.४४) सामाजिक,सांस्कृतिक व्यवस्थेकडून होणारे व्यक्तीचे शोषण व्यक्त करताना लेखक त्यातील वर्गीय,धार्मिक शोषण ही प्रक्रियेकडे निर्देश करीत सांस्कृतिक व्यवस्थेच्या विरोधातील मूल्य विचार व्यक्त करतो.आपल्या कादंब-यातून देशीय संस्कृती मूल्यांचे चित्रण करणारे गवस,त्यातील उच्चवर्णियांनी केलेले इतर वर्गाचे शोषण दाखवत एका श्रेष्ठतर मूल्यांच्या चित्रणाचा दृष्टिकोन स्वीकारतात.

पुढे 'धिंगाणा' पासून 'तणकट' सारख्या कादंबरीपर्यंत स्वातंत्र्योत्तर काळातील समाजजीवनातील विविध जातींचे राजकारण त्यातील नेतृत्व, त्याला आलेली अवकळा, विविध पातळ्यांवरील राजकारणाची एकमेकांशी असलेली गुंतागुंत प्रकट करण्यावर त्यांनी भर दिलेला असून भ्रष्ट समाजाचे चित्रण करताना बदलते अर्थकारण,उद्योग,अन व्यापार, संस्कृती त्याने आणलेली बाजारमूल्ये व व्यापारी जगण्याची मूल्ये,उपभोगवादी वृत्ती अन देशीय संस्कृतीचा व पर्यायाने देशीय मूल्यांचा झपाट्याने होत चाललेला —हास, या सा-यांचे विश्लेषण अनेक चर्चातून, घटना प्रसंगातून ते आपल्यासमोर मांडतात.'कळप'मधील अधेमधे येणारा उपरोधिक सूर सोडता राजन गवस यांच्या कादंबरीत विद्रोहाचा आव्हानात्मक अभिनिवेशात्मक सूर असण्यापेक्षा या मूल्य —हासाचे दु:ख सतत झिरपताना दिसते. हे दु:खही दुपदरी आहे. म्हणजे यातील रघू,कबीर, दिलावर

आपल्या मूल्यांशी तडजोड स्वीकारत नाहीत म्हणूनही दु:खी होतात, तर आपल्या सभोवताली सर्वत्र आपण जपलेल्या मूल्यांचा विरोधी असा मूल्य-हास दिसतो, म्हणूनही दु:खी होतात.

डॉ. किशोर सानप यांच्या मते, "लेखकाच्या नैतिकतेचा संबंध त्याच्या वाटयाला येणा-या दु:खाशी असतो." (६) गवस यांच्या कादंब-यांत नायकांच्या जीवनातील नैतिकता ही दु:खमूलक आहे. चेअरमन, रघू, कबीर हे तिघेही समाजातील माणसांच्या दु:खांचा, शोषणाचा विचार करतात. उदा.'धिंगाणा' मध्ये चेअरमन सांगत असतो,"माझ्या डोळ्यासमोर आमच्या गावातील एक एक पाणंद यायला लागली. एक पाणंद काय सरळ नाही. एक हारबानं खाल्ली तर एक काळु मास्तरनं. एक मोरग्यानं यरगटली तर एक खंडू गुर्जीनं. सगळी बळकट कुळं. बोलणार कोण ? त्यात आम्ही काय करावं म्हटलं तर निम्मी आमच्या बाजूची बी त्यात. मी गप्पगार बसलो." (पृ. १०९)

त्याचप्रमाणे 'कळप' मध्ये रघू हा समाजातील स्त्रियांच्या वाटयाला येणारी दु:खे पाहत असतो. त्याला जाणवणारे दु:ख त्याच्या या निवेदनातून व्यक्त होते. रघू सांगतो, "एक गाव संपल्यावर दुसरं गाव. सारखं सारखं तेच ते ऐकणं. कोण नवसासाठी यल्लामाला सोडलेली तर कोण डोक्यात जट झाली म्हणून. कोण गादी चालवायला तर कुणाचं लगीन होत नव्हतं म्हणून. सगळ्याच अतृप्त आणि कोंडलेल्या. प्रत्येकीच्या डोळ्यात नवं दु:ख, नवी खदखद. त्यांच्या पदराआड लपलेल्या शरीराचे हुंदके, कुणाची निर्ढावून गेलेली मानसिकता तर कोण स्वत:तच कुढत बसलेली. कुणाला चोरटया सुखाची सवय लागलेली तर कोण राजरोस पुरूष ठेवून घेऊन जगणारी. कोण जगण्याची हिंमत हरलेली तर कोण सूड म्हणून प्रत्येक गोष्ट बिनधास्त करणारी. एक ना हजार प्रकारच्या बायका. चार दिवसात माझ्या मेंदूचा भुगा झाला आणि देव किळसवाणा वाटाय लागला. च्या मायला, किती होतो आपण आडणचोट !"(पृ.४३-४४) सानप यांच्या वरील मताचा विचार केला असता हे लक्षात येते की नीतीने जगणा-या या नायकांना समाजाकडून त्रास दिला जातो. उदा.'तणकट' मध्ये,कबीर अत्यंत शांतपणे, मुद्याला धरून बोलत होता. त्याच्या बोलण्यानं

बाळासाहेब अधिक अस्वस्थ होत होता. बनसोडे, आनंदा कांबळेला त्याची बाजू चुकीची आहे हे पटवून देणं कठीण झालं होतं. म्हणून शेवटी बनसोडे म्हणाला,

"आता झालं गेलं विसरून जायचं आनी तू सगळ्यात सामील व्हायचं."

"म्हणजे काय करायचं ?" कबीरनं प्रश्न केला.

"ह्येच की, सगळा समाज एकत्र करायचा. गाववाल्यांविरूद्ध लढायचं. सगळ्या पोरांना संघटित करायचं."

"कशासाठी ?"

"आपल्या हक्कासाठी."

"ह्यात हक्काचा मुद्दा कुठं हाय ? हे तर सगळं वेगळंच चाललंय. यात कशाला सामील व्हायचं ?"

"तू काय माझी उलटतपासणी घेतोस व्हय रंऽऽ" बनसोडया एकदम तरपासला. त्याला कबीरचा राग येऊ लागला होता.

"मी उलटतपासणी घेत न्हाई फक्त समजून घेतोय"

"म्हणजे तू लई श्याना समजतोस स्वत:ला."

"वाटल्यास तसं म्हणा."

कबीर शांतपणे म्हणाला. पण त्याचा आवाज बदलला. आनंदा कांबळे मध्ये पडतच म्हणाला,

"तसं न्हाई कबीर. चळवळ आपल्याला मिळून चालवायची हाय. विचार कर. मागनं सांग. पण तू यात यावास असं मला वाटतंय."

"माझा विचार पक्का झालाय. मला तुमच्यात यायचं न्हाई." कबीर निर्णायकपणे म्हणाला. तसा बनसोडे एकदम उठतच म्हणाला,

"चलाऽऽ जाऊ दे बोंबलत. मागनं आपुणच ईल टाचा घासत. लई श्याना झालाय. ह्येला त्या फण्या कांबळ्यानं फितीवलाय. उठाऽऽ"

"बनसोडे, फणींद्र सरांचं नाव घ्यायचं न्हाई. तुमी आमच्या गावात आलाय म्हणून गप्प

बसतो. पण तुमी आता खरोखरच निघा."

"न्हाई तर काय मारणार हाईस?" बनसोडे एकदम टोकावर आला तसा आनंदा कांबळेनं त्याला पुढं घालून तक्क्यातून बाहेर काढला.(पृ.९१-९२)

अशाप्रकारे नायकाची नैतिकता समाज टिकू न देण्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यावेळी त्याला संघर्ष करून दु:ख, त्रास सहन करावे लागतात. गवस यांचे नायक आपल्या जीवननिष्ठेचा विचार करीत कुठलीही तडजोड करत नाही. त्यांचे वागणे, बोलणे स्पष्ट असते आणि म्हणून अनेक प्रकाराचे त्रास त्यांच्या वाटयाला येतात. उदा.'कळप' मध्ये रघू सांगतो,"दिलावरला रस्त्यातच सोडलं. सायकलवर टांग टाकली. चाललोय कुठं ? माझं मलाही कळत नव्हतं. नुस्ती गरगर. महाजनसर, असंही वागू शकतात. का वागले असतील असं ? दिलावरच्या मतानुसार आयुष्यात जपण्यासारखा माणूस. आपणही तसंच समजत गेलो. शब्दावर जीव टाकला. हाकेला काळजात कोरलं. मनाच्या गाभा-यात जप केला. सगळंच संपत जाताना काही तरी आहे असं वाटत गेलं. त्यातलं काहीच खरं नाही. सगळ्यांचेच पाय वाळवीनं खाल्लेले. मातीलाच कीड. वाळवी अशी कशी पसरत गेली ? वाळवी मनात. वाळवी आत, बाहेर. पेशीपेशीत. आपणही वाळवीचाच कीडा.... सरळ लक्ष्मी बारची पायरी गाठली. समोर पेला. ओल्डमंकची बाटली. बाटलीवर काळसर माकडाचा चेहरा. त्याचाच हळूहळू गांधी नंतरचा महात्मा. भर्रकन बाटली पेल्यात. तर तिथं तळाला महाजन, सनमाडीकर आणि सुर्शा. गप्पकन डोळे मिटले. घटाघटा घोट घेतले. नरडं भाजत गेलं. नंतर पुन्हा पुन्हा तेच.... बाटली संपली. मेंदूच्या आळ्याच आळ्या. च्याआयला, आपण चळवळ फिळवळ, लेखन-बिखन, तात्त्विकता फिकविक्ता असल्या फालतू लफडयात फुक्कट अडकलो. भिकारचोट आपण. उद्योग भिकारचोट. एकदम डोकं औट. बाहेर पडल्या पडल्या जोरात सायकल रेटाय सुरवात केली. किर्रऽऽ अंधार." (पृ. ३८६)

'तणकट' मध्ये कबीरला सहन करावे लागणारे दु:ख म्हणजे महारवाडयात शेडबाळे द्वारा चालविणा-या जाणा-या चळवळींमध्ये कबीर भाग घेत नाही. म्हणून वेळोवेळी

महारवाडयातील दादबा, गौत्या हे कबीरच्या कुटुंबाला धमकी देत असतात. गवस यांच्या कादंब-यातील नायक दु:खाचा पर्याय स्वीकारून जगत असताना दिसतात. उदा.'धिंगाणा' मधील शेवट, "गोठणाचा चेरमन! म्हणत मी भन्नाट हसलो की समोरचा माणूस एकदम गोंधळायचा. मग मला एकदम ग्रेट वाटायचं. डोक्यातून काय केलं तरी हे सगळं जाईना. तळ्याच्या काटावर आलो. सगळं गाव समोर. घरांची गर्दी, गल्ली, गल्ली डोळ्यासमोरून सरकाय लागली. मग चावडीवर नजर स्थिरावली. चावडी पेटवून टाकावी, असा भन्नाट विचार डोक्यातून वर आला." (पृ. २६५)अशी चेअरमनची अवस्था होते.

नेमाडे यांनी नैतिकतेचा आणि दु:खाचा संबंध दाखवताना लिहिले आहे, "कुठल्याही संवेदनाक्षम माणसाला जगण्याच्या कोलाहलात नैसर्गिकपणे वेदना होत असतात. जगण्याचा आणि त्याचा जेव्हा संवाद साधला जातो, त्याला आपण सुख म्हणतो आणि संवाद साधलाच जात नाही त्याला आपण दु:ख म्हणतो. थोडक्यात हा जन्माला आल्यापासूनचा व्यापार आहे. मला असं वाटतं की, लेखकाच्या वाटयाला हा दुसरा भाग जास्त येत असावा, कारण त्याची स्वत:ची एक नैतिक भूमिका ठरलेली असते आणि त्याला सर्व बाजूंनी मोठया प्रमाणावर विरोध होत असतो. या नैतिक भूमिकेची भोवतालशी तडजोड करायची बहुधा लेखकाची तयारी नसते. त्यामुळे नैतिकता बाळगणा-या लेखकांसारखाच इतरांनाही सर्व बाजूंनी होणारा ताप वाढत जातो. मी तर असं समीकरण मांडेन की, जितकी एखाद्याची नैतिकता स्पष्ट आणि व्हर्टिकल असेल तितक्या प्रमाणात त्याला जास्त सफरिंग होत जाईल." (७) गवस यांच्या नायकांना त्यांच्या नैतिक भूमिकेमुळे दु:ख सहन करावे लागते. राजन गवस यांच्या 'कळप' ,'तणकट' या कादंब-यातील रघू, कबीर हे सतत आपल्या सभोवतालच्या सामाजिकतेबद्दल व्यक्तींच्या जगण्याबद्दल विचार करीत आहेत. असा विचार करताना त्यांच्या जगण्याच्या काही धारणा आहेत. उदा.'तणकट' मध्ये कबीर विचार करतो ,"ह्या पोरांना आपलं हित कळत नाही आणि काहीच कळत नाही. कुणाच्याही सांगण्यांनं ही काहीही करायला तयार होतील. बारदेस्करनं आपल्या स्वार्थासाठी यांच्या डोक्यात भरवलं आणि ह्यांनी भांडण काढलं. ह्यात यांना थोडाही विचार करावा,

असं का वाटलं नसेल? हायस्कूलमध्ये शिकणारं ह्यांच्या घरातील कोणीच नाही. मग यांना एकदम बाकीच्या पोरांचा कळवळा कसा आला? समाजाची भाषा ही कार्टी बोलतात. ह्यांना काय समजतो समाज आणि समाजाचं हित? समाजाचं हित कळालं असतं तर अशी बोंबलत फिरली असती का? नापास होऊन शाळा सोडली तेव्हा यांना स्वत:चं हित कळालं नाही आणि समाजाचं हे हित करणार."(पृ.४७)

गवस यांच्या कादंबरीतील रघू, कबीर इ. पात्रांचे व्यक्ती आणि समाज यांच्या परस्परसंबंधाबद्दल काही मूल्यात्मक विचार आहेत. अनेक घटना, प्रसंगातून विश्लेषणाने ते अधिकाधिक स्वच्छ,स्पष्ट,सूक्ष्म आणि टोकदार होत जातात. कारण या सा-यांच्या संदर्भात सतत चाललेले विचार त्यातील धागेदोरे उलगडण्याची विचारक्षमता अथवा अशा विचारांमागे असणा-या मूल्यत्मक धारणा त्यातून निर्माण होत जाणारी भूमिका व त्यानुसार घेतलेले निर्णय म्हणजे भूमिका — निर्णय आणि परिणामाच्या स्वीकाराची तयारी ही एका अर्थाने कृतीची रुपे आहेत. कबीर अथवा रघू ही पात्रे कोणतीही ठोस कृती करताना दिसत नाहीत, असा त्यांच्यावर आक्षेप घेतलेला असला तरी कृतीचा हा सारा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. अंजली कुलकर्णी 'कळप' बद्दल लिहितात,"या संपूर्ण कादंबरीत खटकण्यासारखी एक गोष्ट ठळकपणे जाणवते, ती म्हणजे रघू हा कुठेही स्वत: कृतिशीलतेच्या पातळीवर उतरत नाही. स्वत:च्या तीव्र प्रतिक्रिया नोंदवतो परंतु स्वत:ला काय करायचे आहे हे तो कधीच स्वत:साठीसुध्दा सिध्द करून दाखवत नाही." (८) कबीर महारवाड्याची संघटना बांधतो आहे, त्यांच्यासाठी चळवळी करतो आहे. अशा कृतीच्या रूढ अर्थाने कादंबरीत काही दिसत नसले तरी, शेडबाळेच्या कारस्थानात सहभागी होण्यासाठी नकार देणे, गौतमला समजावून सांगणे,चर्चा करणे या सा-या त्याच्या प्रकट नसणा-या कृतीमागे एक भूमिका आहे. आणि या भूमिकेनुसार स्वत:पुरता निर्णय घेणे त्याच्या हातात आहे. या पात्रांच्या या कृतीने त्यामागील भूमिकेने अन निर्णयाने त्यामागील संवेदनशील विचारीपणाने त्यांना सतत दु:खी व्हावे लागते, असे दिसते.

हे नायक नैतिक भूमिकेतून जीवनमूल्यांचा विचार करीत समाजाकडे पहात

असतात. उदा. 'कळप' मध्ये रघू त्याबद्दल म्हणतो,"शंक-याला बिनधास्त उडी मारता येते. कारण तो शंक-या आहे.म्हणूनच तो प्रचंड शिव्या देऊन, भांडण करूनही गीताच्या प्रेमात पडू शकला.

त्याला ठरवलेली प्रत्येक गोष्ट करता येते.

त्याच्याजवळ आपण असलो काय नसलो काय ?

जे वाटतं ते तो करूनच टाकील." (पृ. ३५७)

तर 'तणकट' मध्ये,"तो सगळ्यांच्या बरोबर कॉलेजकडं निघाला. पण त्याच्या डोक्यात तेच, एवढं सगळं म्हारवाडयात घडतंय. आपण काहीच करू नाही शकत. चार-पाच लोकांनाही समजूतदार नाही आलं बनवता आपल्याला. मग आपण म्हारवाडयात राहिलोच कशाला ? त्यापेक्षा गाव सोडलं असतं तर ..... पण गाव सोडणं हे माझ्या तरी हातात कुठं होतं. आपण लोकांना जवळ करू शकलो नाही हे आपलं अपयश. आपल्यापेक्षा गौत्या अधिक भारी लागला. पण त्याच्या मार्गानं आपल्याला जायचंच नाही. मग लोक जमवायचा प्रश्न कुठं येतो ? मग आपण एकटयानं करायचं काय ? फक्त बघत बसायचं ..... ? उलटसुलट विचारानं त्याला हैराण केलं. तो एकदम घायकुतीला आला. मग त्यानं डोकं झिंजाडलं. थोडं सैल वाटलं."(पृ.१०९) प्रचलित जीवन पध्दतीपेक्षा नैतिक भूमिकेतून जगण्याचा या पध्दतीने येणारा अपरिहार्य एकाकीपणाही अनेकवेळा त्यांना ग्रासून टाकतो. गवस यांचे नायक एक विशिष्ट पद्धतीचे विचार करत जीवन जगत असतात. ही पद्धती समाजाच्या प्रचलित जीवन पद्धतीपेक्षा वेगळी असते. तरी हे नायक आपली जीवन पद्धती सोडत नसतात. या सडक्या समाज व्यवस्थेत नैतिक भूमिका टिकवत जगणारे हे नायक न-नैतिक कृती करत नसतात.

गवस यांच्या 'धिंगाणा','कळप','तणकट'कादंब-या क्रमश: विकसित होत गेल्या आहे. त्यातून प्रकट होणारी गवस यांची जीवनदृष्टीही अधिक व्यापक होत गेलेली दिसते. चेअरमन, रघू द्वारा प्रकट झालेली जीवनदृष्टी कबीर द्वारा अधिक खोलात शिरून मांडलेली दिसते.'तणकट' मध्ये कबीरचा मित्र बल्लाळ याचा जीवनविषयक दृष्टीकोन हा

लेखकाचाच जाणवतो. कबीर आणि मोहन बल्लाळ यांच्या या संवादामध्ये आपल्याला हे जाणवते. मोहन बल्लाळ कबीरला सांगत असतो,"करायचं काहीच नाही. फक्त बघत बसायचं. कबीर, मला एक नेहमी वाटतंय. तुला पटतंय का बघ – आपण कुणीही जग सुधारायचं कॉन्ट्रॅक्ट घेतलेलं नाही. का म्हणशील तर ती आपली ऐपत नाही आणि आज परिस्थितीही तशी नाही. बाबासाहेबांचं ठीक होतं रे. त्यांच्या वेळी सगळे तुमच्या समाजातले अडाणी होते. म्हणजे शुद्ध गुलाम होते. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यावेळी सर्वत्र गांधीजी होते. त्यांचा लोकांच्या मनावर जोरदार पगडा होता. त्यामुळेच ब–या वायटाची धास्ती होती. म्हणून बाबासाहेब तुमच्या समाजासाठी एवढं करू शकले. आज तेच बाबासाहेब असते तर त्यांना पुन्हा पुन्हा मार खावा लागला अस्ता. नव्हे त्यांचं डोकं औट झालं असतं. त्यामुळं तुम्ही म्हणजे तुमची दलित लेखक मंडळी गांधींना कितीही वाईट म्हणत असले तरी बाबासाहेबांच्या संपूर्ण कर्तृत्वाला गांधींच्या आणि फुलेंच्या कार्याची पार्श्वभूमी आहे, हे विसरता कामा नये. पण मुद्दा तो महत्त्वाचा नाही. तर मी काय सांगत होतो – आपण जग सुधारायचा मक्ता घेतलेला नाही. आज काळ असा आहे की आपण आपल्या व्यक्तिगत आयुष्यात ठाम उभारण्याचा प्राणपणानं प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठीच जीवापाड धडपडलं पाहिजे. म्हणजेच हे चळवळ बिळवळ सोडून मरेपर्यंत अभ्यास केला पाहिजे. म्हणजे आपल्याला टिकता येईल."(पृ.२०४)'धिंगाणा','कळप','तणकट' मधून नायकांच्या व्यतिरिक्त शंकर दिलावर, मोहन बल्लाळ, काशिनाथ, सुबाना ही अन्य पात्रेसुद्धा जीवनविषयक दृष्टिकोण मांडताना दिसतात.'कळप' मध्ये दिलावर म्हणतो, "तुझा हा गांधीनंतरचा महात्मा म्हण किंवा कलंदर पानके म्हण, दोघेही मनोरूग्णच. त्यांना सायक्याट्रीस्टकडं घेऊन गेलं पाहिजे. जगातली प्रत्येक गोष्ट आपल्याच इशा–यानं झाली पाहिजे असं फक्त दोघांनाच वाटतं. एक गांज्या ओढणा–या माणसाला आणि दुस–या मनोरूग्ण माणसाला. ह्या लोकांना प्रसिद्धीची प्रत्येक गोष्ट करावी, आपणच लोकांच्या समोर असावं, आपणच हुकमत गाजवावी असं जे वाटतं ते त्यांच्या मनोआजाराचं सूचक आहे. अशी माणसं अतृप्त

असतात म्हणूनच ती विवेक गमावून बसतात. अभ्यासाला व्यक्ती म्हणून त्या चांगल्या आहेत. अशा लोकांना शेवटी ठार वेड लागण्याची जास्त शक्यता असते. तू असं का करत नाहीस ? ह्या माणसांची ही जी मनोरूग्ण अवस्था आहे ती नीट समजून घेऊन कादंबरीच्या फॉर्ममध्ये मांडायची. म्हणजे करायचं काहीच नाही फक्त ते जसे जगत आले तसेच फक्त शब्दात मांडायचं. मोठं काम होईल. जमलं तर ह्या नादाला लाग. त्यांना अन्य कशानं मारून काय उपयोग ? आपण आपल्या शक्तीनं त्यांना हुतात्मा करण्यातला प्रकार. त्यापेक्षा त्यांनी आयुष्यभर माणसं निरोधासारखी वापरली. आपण त्यांना मांडणीसाठी वापरून माणसाच्या वर्तनप्रेरणा शोधायला काय हरकत ? सिरिअसली विचार करून बघ. कदाचित माझं मत तुला पटेल."(पृ. ३८६-३८७)

'कळप','तणकट' या कादंब-यामधून सैरभैर वृत्तीची तरूण पिढी आपल्याला दिसते. ती ख-या अर्थाने एकूण भारतीय समाजव्यवस्थेचे प्रातिनिधिक चित्रण करतात. हे स्वीकारावे की ते स्वीकारावे ? इकडे जावे की तिकडे जावे ? अशा अवस्थेत दिसतात.त्यांच्या निवेदनातून संपूर्ण पिढीची वेदना उत्कटपणे व्यक्त होते. कारण चळवळीच्या नांवावर कॉलेजातील प्राध्यापक विद्यार्थ्यांना त्यात गुंतवतात. तर लेखनाच्या नांवावर चालणारी भोंदूगिरी म्हणजेच विविध चालणारी शिबिरे, तसेच विविध मासिकांमध्ये लेख छापविण्यासाठी चालणारी भ्रष्ट नीती, अशा अनेक गोष्टींमुळे आपल्या समाजव्यवस्थेचे प्रभावी चित्रण झालेले दिसते. आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर आपणही एखाद्या कळपाशी जुळवून घेतले पाहिजे. आपले अंतर्भूत स्वत्व दडपून प्रवाहात सामील झाले पाहिजे. हे खरे म्हणजे कोणत्याही मनस्वी कलावंताच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब आहे. असे हे 'कळप' एकट्या पडलेल्याची मेलेल्या म्हशीप्रमाणे दुर्दशा करून टाकतात असे सूचित करणारा 'कळप' कादंबरीतील एक प्रतिकात्मक उतारा आहे. 'सकाळी सकाळी घर सोडलं. पाय गळाटून गेलेले. धाप लागली. गोठणावर थांबलो तर प्रचंड मोठया गिधाडांच्या कळपांनी गोठण भरलेला. हळूहळू सरकत सरकत गिधाडांच्या जवळ पोहचलो. तीन चार फुट उंचीचं एक एक. भली मोठी दणकट चोच. पंखावर काळपट

घाणेरडी पिसं. काळेशार पाय. क्रुर डोळे. पन्नास शंभराचा एक एक कळप मध्ये मेलेल्या म्हशीचा "आडवा पडलेला टरटरीत फुगलेला देह. बोचकरून बोचकरून मास बाहेर आलेलं. तांबूर पांढरट गिधाडांची स्पर्धा. आभाळभर भोवती शंभर भर. आजुबाजुला तेवढीच घिरटया घालत. चांगला बेचक्याचा गुंड उचलला. बळ एकवटून नेम धरून फेकला. तर तो म्हशीच्या टरटरीत फुगलेल्या पोटावरच बसला फक्त आवाज झाला. गिधाडं जराशी बावचळली. पुन्हा उद्योगात. मग फक्त बघत बसलो. त्यांच्या चोचीत लोंबकळणारे मांसाचे लगदे!"(पृ.३८८) या मेलेल्या म्हशीच्या आणि लचके तोडणा-या धाडाच्या प्रतीकातून या कादंबरीचे आशयविश्वच व्यक्त होते. गिधाडांना मारहाण करायला जावे तर मेल्या म्हशीलाच वार लागावा हे एकूण समाज वास्तव आणि अन्यायाची बाजू घेऊन लढणा-यांचं हे दुर्दैव,त्यातून प्रकट होते.

'तणकट' या कादंबरीत कबीर या नायकाची ही अशीच अवस्था व्यक्त होताना दिसते. स्वातंत्र्यानंतर दलित सवर्णांच्या बदलत्या सामाजिक संबंधाचा आढावा या कादंबरीत घेतलेला दिसतो. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अनेक वर्षे विषमतेचे, उपेक्षेचे चटके बसलेल्या दलित समाजाला जेव्हा कायद्याने संरक्षण मिळाले तेव्हा त्यांच्यावर अन्याय करणारा सवर्ण समाज त्यांना दबकू लागला. हा या कादंबरीचा मुख्य धागा असून त्याला आशयाचे अनेक विविध संदर्भ धागे आहेत. या कादंबरीत दलित समाजातील, मराठा समाजातील पात्रे बहुतांशी असून ग्राम्य परिसराच्या पार्श्वभूमीवर त्याचे चित्रण होते. शहरातील दलित चळवळीचे स्वरूप ग्रामीण भागातील दलित चळवळीपेक्षा वेगळे आहे. कारण शहरी भागातील दलित हा स्वावलंबी आहे परंतू गावगाडयात मात्र अजूनही समाज आर्थिकदृष्टया स्वावलंबी नाही. त्यांना अजूनही मराठयांच्या बांधावर जावे लागतेच आणि आपले पोट भरावे लागते. म्हणजेच दलित सवर्णाच्या संबंधाचे स्वरुप येथे परस्परावलंबी आहे अशा स्थितीत तेथे येणारा संघर्ष आणि त्याची 'झळ' एकूण ग्रामव्यवस्थेला बसलेली दिसते. ती आर्थिक व सामाजिक अशा स्वरूपाची असून त्यातील व्यक्तींच्या मानसिकतेचे ही येथे चित्रण होते.

ह्या संघर्षाच्या निमित्तांने दोन्ही समाजातील पात्रे आपले मनोगत वेळोवेळी व्यक्त करतात. त्यातूनच समकालीन ग्रामीण समाज वास्तव आपल्याला दिसून येते. 'तणकट' मध्ये बाळासाहेब शेडबाळे, 'कळप' मध्ये बाबा घोसरवाडकर सारख्या व्यक्तिरेखा आपल्या समाजात नेतृत्व करताना, सगळीकडे वावरताना दिसतात. ज्यात त्यांची भ्रष्ट नीतीच दिसून येते. तसेच 'तणकट' मध्ये जातीजातीत परस्परांविषयी निर्माण झालेले गावागावातील मतप्रवाह आहेत आणि हेच आजच्या ग्रामीण समाज व्यवस्थेचं खरं चित्र आहे. तसेच त्यातून भविष्याच्या दिशाही सूचित झालेल्या आहेत.

यावरून लक्षात येते की लेखकाची दृष्टी प्रामाणिकपणे व्यक्ती व समाजाच्या संबंधातील गुंतागुंत शोधून त्यांना कलात्मक रूप देण्याची आहे. अशी दृष्टी असलेले लेखक वास्तवाच्या तळाशी जाऊन भाषिक कृतीची निर्मिती करू शकतात. राजन गवस हे अशाच लेखकांपैकी आहेत. त्यांनी त्यांच्या कथा कादंब-या मधून व्यक्ती आणि समाजाच्या परस्परपूरक आंतरिक संबंधाचा आढावा घेतलेला आहे. समाजाच्या अंत:स्तरात जाऊन व्यक्ती व समाजाच्या आंतरिक संबंधाचा ते शोध घेतात.

कादंबरीतील नायक निवेदक व्यक्ती आणि समाजाचा संबंध दाखविताना अनेक बारीकसारीक तपशील देतात. विश्लेषण करतात. हे नायक आत्मनिष्ठ असले तरी समाजाच्या चक्रव्यूहातच ते जगतात. समाजातील लोकांमध्ये राहूनच ते व्यक्ती व्यक्तीचे संबंध आणि व्यक्ती व समाजाचे संबंध तपासतात. समाजाचे जीवन खंडित आणि अ-नैतिक असल्याची जाणीव होत असूनही ते समाजापासून लांब राहून संन्यस्त जीवन स्वीकारत नाही तर समाजजीवनाच्या खोलात जाऊन माणसाचे खरे रुप दाखवितात. या कादंब-यातून समाजाचे विघटन होताना दिसत असले तरी हे नायक आपली नैतिकता टिकविण्याची धडपड मात्र करत असतात.

- <u>माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी :</u>

राजन गवस यांनी आपल्या कादंब-यांमध्ये सामान्यमाणूस केंद्राशी ठेवला आहे.

समाजातील विविध स्तरांवरील विविध स्वभावाची साधीसुधी माणसे कादंबरीत येतात. त्यांना सामान्य लोकांच्या जगण्यातूनच समाजात काहीतरी विशेष क्रांती घडू शकेल असा आशावाद आहे. उदा.'तणकट' मध्ये दलित कबीरशी गावातील आक्काबा राणे माणुसकीच्या दृष्टीने वागतात. या संदर्भाने थळू आजा म्हणतो, "लेकरा, आसं न्हाई. एकदम तोडून नाही जमत गावाला. किती केलं तरी पांढरीतलीच हाईत तीबी. काळीज एकच हाय. त्यास्नीबी न्हाय दुकवायचं. हळूहळू गावात बी फरोक झालाय. तुज्या सारख्या पोराला मांडीला मांडी लावून घेत्यात. पोरा, नशीबवान हाईसा. आमाला बेलट्या शिवाय मारा नव्हता. आता त्ये गेलं का न्हाय ? तसं जाईल सगळं हळूहळू. बाबा साबाची पुण्याई. दुसरं काय ?"(पृ.६९)

गवस यांच्या कादंब-यांचा विचार करता लक्षात येते की नायकाच्या व्यक्तिमत्त्वात येणारी उच्चतर स्थिती ही फक्त 'तणकट' मध्येच जाणवते. या कादंबरीतील कबीर हा अनेकवेळा या स्थितीत जाऊन उभा राहतो. गवस यांनी जीवनमूल्यांचा विचार करत या कादंबरीमध्ये समाजाचा विस्तृत परिसर त्यातील चांगल्या, वाईट प्रवृत्तींच्या माणसांसह चित्रित केला आहे. त्याचप्रमाणे माणसांव्यतिरिक्त अन्य पशुपक्षी, झाडे यांचा विचार, विश्वजाणीव व्यक्त करताना केलेला आहे. डॉ.किशोर सानप या संदर्भात म्हणतात, "नैतिकता ही संज्ञा मूल्यविचार या अर्थाने, व्यापकपणे, लेखनातून व्यक्त झाली पाहिजे. लेखकाने मांडलेला मूल्यविचार हा अर्थातच समाजाला समांतर, परंतु समाजाला वास्तवाचे दर्शन घडविणारा आणि समाजाला झोपेतूनही जागे करणारा असला पाहिजे. त्यासाठी खूप नीतिदर्शनाचे पाठ देण्याची गरज नसते. प्रत्यक्ष वास्तव आणि त्यामागे दडलेले सत्य वस्तुनिष्ठपणे आणि समग्रपणे मांडण्याची धडपड ही पुरेशी असते. अशा जाणीवपूर्वक लेखन करणा-या कादंबरीकाराला मुद्दामहून कोणत्याही विचाराचे उदात्तीकरण करण्याची गरज राहत नाही. समाजाकडे अलिप्तपणे पाहतानाच कादंबरीकाराला एखादा समांतर मार्ग सापडतो, जो माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याचे शिकवितो. समाजातील व्यावहारिकतेच्या मर्यादाही ओलांडण्यास भाग पाडतो. अशा प्रकारचे लेखक समाजातील सर्वच घडामोडींकडे तटस्थपणे पाहतात. कोणत्याही घटना प्रसंगात लिप्त न होता किंवा

झाल्यावरही पुन्हा बाजूला होऊन ते अलिप्तपणे आपल्या अनुभवांचा सतत अन्वयार्थ लावून वास्तवाच्या पलिकडे दडलेल्या उच्च तत्त्वाचा किंवा सत्याचा शोध घेतात. जीवनविषयीचे गंभीर, परंतु तेवढेच स्वाभाविक चिंतनही सहजपणे मांडतात. असे नैतिकतावादी लेखक / कादंबरीकार, लेखक म्हणून आपल्या कृतीकडे पाहत नाहीत, तर ती एक सामाजिक कृती असून तिच्या पूर्णतेसाठी, संपूर्ण अभिव्यक्तीसाठी सतत अस्वस्थ असतात. त्यांचे अनुभवविश्व त्यांना प्रचंड अस्वस्थता आणि असमाधान देत असते. त्यातूनच त्यांचे चिंतन आणि मांडणी, मूल्यविचारांसह स्वाभाविकपणे कादंबरीच्या अवकाशाला भरून काढते."(९)

डॉ. सानप यांनी मांडलेल्या लेखकाच्या जीवनदृष्टीचे स्वरूप गवस यांच्या कादंबरीतून दिसून येते. गवस यांनी समाजात घडणाऱ्या घटनांमधून दिसून येणारी जीवनमूल्ये, समाजमूल्ये यांचा विचार वास्तवाच्या पलिकडे जाऊन केलेला आहे. वास्तवाच्या पलीकडची स्थिती शोधताना नैतिक भूमिकेला धरूनच कबीर हा जीवन जगत असतो. हे आपल्याला पुढील प्रसंगातून दिसून येते.

"चालता चालता तो थांबला. जवळच्या दगडावर टेकला. अंधाराची तरंगत जाणारी वर्तुळं आणि त्याच्या गतीत मिसळलेले त्याचे श्वास. हळूहळू श्वासाचाही अंधार होतो आहे, असा भास त्याला होऊ लागला. मग एक अंधाराचा पुंजका त्याच्या डोळ्यातच गडद झाला. ही पोरं नेमकं कुणाचं अनुकरण करायला लागलीत ? ह्या अशा घिसडघाईनं काय होईल ? गावाला अक्कल शिकवायचीच आहे. पण असं चाल करून जाऊन काय उपयोग ? आपली ताकद काय ? त्यांच्यापुढं आमचा टिकाव कसा लागेल ? पद्धतशीर लढायला हवं. पण कुणी सांगायचं कुणाला ?"(पृ. ७७)

कादंबरी ही समाजाची सांस्कृतिक गरज मानली जाते. व्यक्ती, समाज, काळ यांचा विचार त्यातून केला जातो. म्हणून कादंबरीकार आपल्या देशकालपरिस्थितीचे भान ठेवून कादंबरी लिहितो आणि कादंबरी लेखनातून सामाजिक उत्तरदायित्वही पार पाडत असतो. कादंबरीकार हा समाज व व्यक्ती यांचे संबंध ही खोलात शिरून तपासत असतो. मानवी

प्रश्नांचे, समाजाच्या वास्तवापलीकडचे ही विचार त्याला कादंबरीत मांडावे लागतात. त्याबद्दल नेमाडे म्हणतात,"एकूण सगळ्या समाजाच्या अंत:स्तराच्या सगळ्या जाणिवा कथनाच्या द्वारे व्यक्त करणारा असा तो लेखक असतो."(१०)

डॉ. किशोर सानप यांच्या मते, "कल्पित आशयापेक्षा प्रत्यक्षातला आशय वास्तववादी परंपरेत महत्त्वाचा असतो. माणूस आणि समाजाचे आंतरसंबंध हा कादंबरीचा गाभा असून, माणूस आणि सत्त्व, माणूस आणि भोवतालची सृष्टी असा आकृतिबंध कादंबरीचा असावा लागतो. कादंबरीकाराचे अस्तित्व समाजसापेक्ष असून, समाजातील समूहाच्या जाणिवा त्याला व्यक्त कराव्या लागतात. कादंबरीकाराला नैतिकता स्वीकारून कादंबरीची निर्मिती करावी लागते."(११)

राजन गवस यांच्या सर्व कादंब-या सामाजिक जाणिवेतून लिहिल्या गेलेल्या आहेत. या सामाजिकतेमध्येच माणूस आणि त्याचा आसपासचा परिसर येतो. माणूस आणि समाज यांचे संबंध खोलवर तपासत, त्यातील गुंतागुंत शोधून त्यांना कलात्मकतेने कादंबरीत मांडलेले दिसते. गवस यांच्या 'चौंडक' ते 'तणकट' या कादंब-यांमध्ये व्यक्ती आणि समाज यांच्या आंतरिक बाह्य संबंधाचा विचार केला गेला आहे.'चौंडक' ,'भंडारभोग' मध्ये समाजाच्या रूढी, परंपरेचे बळी यांचा विचार केलेला आहे तर 'धिंगाणा','कळप','तणकट' मध्ये समाजातील विविध क्षेत्रात असलेली भ्रष्टता, सडलेपण दाखवताना माणूस आणि समाज यांच्या संबंधातील गुंतलेपण दाखवतात. उदा.'धिंगाणा' मध्ये चेअरमन सांगतो, "आणि नोकरी मिळायला बापाची प्रतिष्ठा लागतेच की. ती आमच्या बापाला कुठं हाय ? गावात चार मानसं मानतात. म्हणजे बापाला प्रतिष्ठा आहे, असंच वाटतं. गाव सोडून ह्याला कोण कुत्रं विचारतं ? आणि म्हणे प्रतिष्ठित ! अर्थात याच्या प्रतिष्ठेवर नोकरी पाहिजे आहे कुणाला ? मिळाली तरी मी करणार नाही. कोण करेल ? सारखं सारखं मरे पर्यंत माझ्यामुळं नोकरी लागली, हे ऐकून कोण घेणार ? त्याच्या जीवावर नोकरी मिळवायची म्हटली तर मिळूही शकेल." (पृ. १)

गवस यांनी हे संबंधांचे वर्णन निवेदक म्हणून दिले आहे. हे वर्णन देताना निवेदक म्हणून त्याबद्दल कधी आपली प्रतिक्रियाही देतात. तर कधी अलिप्त ही राहतात. यातील नायक हे  समाजात मिसळून राहणारे असले तरी,व्यक्ती म्हणून ते आपले विचार,भूमिका बाळगून जगणारे आहेत. समाजात राहणारे हे नायक माणसामाणसाचे संबंध, माणूस व समाजाचे संबंध तपासत असतात. त्यावेळी माणसांमधील अनैतिकता, समाजातील किडलेपण दिसून आल्यावरही त्यापासून लांब जाण्याचा प्रयत्न करत नाही, परंतु शेवटी मात्र या परिस्थितीमुळे ते आशंकित झालेले दिसतात.कादंबरीच्या अवकाशात चेअरमन,रघूला प्रश्न पडतात तर कबीर आपल्यापुरता प्रश्न मांडण्याची कृती करतो.

गवस यांच्या कादंब-यांमध्ये माणूस व समाज यांचे संबंध तपासताना अनेक बारीकसारीक घटना, प्रसंग सूक्ष्म निरीक्षणासह आलेले आहेत. उदा.'कळप' मध्ये रघू म्हणतो," मला तर महात्म्याचा आता राग यायला लागला होता. कारण त्याचा प्रत्येकवेळी नवा ढोंगीपणा. तो पूर्वी बहुरूपीच असला पाहिजे ! "(पृ. १३०-१३१) या समाजात वावरणा-या माणसांच्या मानवी मनाचा ही विचार केलेला आहे. उदा.'कळप' मध्ये दिलावर म्हणाला, ग्रह फिरले की सगळंच बदलत जातं. या महिन्यात गुरूनं घर बदललं आणि शनि मध्यवर्ती आलाय. त्यामुळं सगळं विपरीत घडत चाललंय. अजून तीन-चार महिने तरी हे असंच चालणार. इलाज नही.

मी गंभीर होत म्हणालो, तुझा ह्या कुंडलीशास्त्रावर, भविष्यावर खरंच विश्वास आहे ? तो म्हणाला, प्रश्न विश्वासाचा नसतो. माणसाला सगळे मार्ग बंद झाले की त्याला कशाचा तरी आधार हवा असतो. त्या आधारावर तग धरून जगण्याची धडपड तो करू लागतो. त्यातून आलंच यश तर त्याला पुन्हा जोर चढतो. नाहीच आलं यश तर ग्रहदशा समजून पुन्हा पुन्हा चिकाटीनं झगडत राहतो. झगडण्याचं बळ भविष्य देतं. ते खरं का खोटं ह्या गोष्टी मला गैरलागू वाटतात. भविष्य ही गोष्ट ज्यानं पहिल्यांदा अस्तित्वात आणली असेल त्याला माणसाचा दुबळेपणा ख-या अर्थानं समजला असला पाहिजे.

पण भविष्य माणसाला अधिक दुबळं करतं त्यांचे काय ?

भविष्य सुखवस्तू माणसाला दुबळं करीत असेल पण सामान्य माणसाला लढाऊ करतं असं मला ठामपणे वाटतं. मला तुझ्या ह्या भविष्याच्या गोष्टीच भंपक वाटतात. माझा तर ह्या सगळ्यावर काडीमात्र विश्वास नाही. तुझा विश्वास असावा नसावा हा तुझा प्रश्न आहे. पण अशा गोष्टींकडे वळावं अशी परिस्थितीतच तुझ्या आयुष्यात आली नाही. त्यामुळं तू सुखानं झोपू शकतोस. तुला कुस बदलत टक्कडोळे उघडे टाकून पडावं लागत नाही. कारण झोप मोडावी असं तुझ्या आयुष्यात काही घडलंच नाही. कॉलेज संपल्याला चार वर्षे झाली असतील. ह्या चार वर्षात निवांत झोपावे. अशी रात्रच आयुष्यात आली नाही. झोप मोडलेल्या माणसाला भविष्य फार मदत करतं. नाही तर उघडया रात्री झेलणं झेपण्यातलं नव्हतं. कधीच आत्महत्या केली असती मी. फारच गुंते झालेत जगण्यात.

मी म्हणालो, "तू पुन्हा गंभीर होत चाललाहेस. आपण आता रस्त्याला लागू. सगळीकडचा गच्च अंधार सोबतीला होताच !" (पृ. २२९)

त्याचबरोबर समाजव्यवस्थेमध्ये होऊ लागलेले विघटन कुटुंबापासून सुरू झालेले दिसते. हे आपल्याला 'कळप','तणकट' मध्ये दिसून येते.'कळप' मध्ये रघू सांगतो,"अंधार पडायच्या आत व्हळीचं गवात काढून गोठणीत ठेवणं हे पहिलं काम. मग मोर्चा व्हळीकडं वळवला. तर व्हळी मेलेल्या डोंगरागत धुडच्या धुड. घसाघस उपसायला सुरवात केली तर कडब्याचं कांबाट घुसलं बोटात. मग नैसर्गिक पुढच्या गोष्टी आल्याच. तरीही चिकाटीनं गवत आणून गोरणीत टाकलं. पाण्याच्या चार घागरीला तरी आईला मदत केली पाहिजे. म्हातारपणीही तिनं आम्हाला पाणी पाजायचं म्हणजे भयंकरच. पण दादा नोकरीला. माझे हे असं. पपीला सांगून उपयोग नाही. बाबा इनामदार. मग पाणी आणणार कोण ? चुलते, आम्ही एकत्र होतो तेव्हा बरं होतं. चुलत्या चांगल्या धट्टयाकट्टया. भसाभस पाणी वडायच्या. घर फुटलं आणि पाणीही फुटलं."(पृ.२८)

तसेच 'तणकट' मध्ये महारवाड्यातील म्हातारी सांगते, "गावाला याला तुला लाज वाटती. खरं, ह्या गावचं तुकडं खावूनच न्हानाचा मोठा झाला हाईस. पांढरीला इसरलास तर तुझं चांगलं व्हनार न्हाई. शेवटी मेल्यावर तुला पुराय म्हारकीतच आणाय जायजे. एवढा

एकदम मातू नगंस. चार पैसं आनी बायको झाली म्हणजी जय झालं न्हवं. लई लागतंय. राज्याला त्ये सुईची गरज लागतीया. आनी तुजं तरी काय ? कदी तरी तुला तुझ्या वागण्याचा पचेताप व्हईल. तवा तुजी ही आई मातीत गेल्याली आसंल'. बोलता बोलता म्हातारीच्या डोळ्यात घळाघळा पाणी आल."(पृ.२५-२६) समाजाची विशिष्ट व्यवस्था,त्यातील सांस्कृतिक घटक,जातिवर्गव्यवस्था,त्यातील काहींना आधुनिक काळातील परिवर्तनाच्या वेगात इतिहासाचे ओझे फेकून देण्याची झालेली घाई,मध्यमवर्गीय जीवनाची प्रमाणकं माणसाच्या दुबळ्या अवस्थेत अभौतिक गोष्टींचे आधार शोधण्याची मानसिकता,अनेक घटकांचे चित्रण करताना गवस यांनी व्यक्ती व समाज यांच्यासंबंधांचा खोलवरचा विचार केलेला दिसून येतो.

साठोत्तरी कालखंडात नेमाडे यांनी सामाजिक उत्तरदायित्त्वाचे भान ठेवून लेखन करण्याची परंपरा सुरू केली. त्या परंपरेत राजन गवस यांनी ही लेखन केलेले आहे. गवस यांनी नैतिक भूमिका स्वीकारून लेखन केलेले आहे. नेमाडे सांगतात, “मोडकळीला आलेल्या रूपवादी कादंबरीच्या ह्या काळात काही थोडया नव्या कादंबरीकारांनी नवी नैतिकता आपल्या कादंब-यांमध्ये दाखवली आहे. त्यांनी आपल्या पिढीच्या रोगाची लक्षणे सांगितली आहेत, त्यावर उपचार मात्र त्यांना माहीत नसावा. नैतिकता ही लेखकाच्या उद्देशावरून ठरवायची असल्यास ह्या कादंबरीकारांची नैतिकता निश्चितच प्रखर आहे, असे वाटते. त्यांचे नैतिक पेचप्रसंग सामाजिक जाणिवेत असतात. ह्या कादंब-यांनी जुन्या कादंबरीपासून संपूर्णपणे वेगळे वळण घेतले आहे. ह्यातील नायकांना जगणे हीच सर्वात कठीण समस्या वाटते. जितके ते समाजात अधिकाधिक मिसळतात, तितके ते अधिक परात्म होत जातात. कृतिपरत त्यांच्यात आहे, पण कृतीसाठी योग्य संधी त्यांना कधी सापडत नाही."(१२) गवस यांच्या कादंब-यातही नायक हे प्रभावी अशा कृती करू शकत नाहीत. उदा. 'तणकट' मध्ये धूर्त शेडबाळे महारवाडयातील लोकांना फसवून सुलीला घेऊन पळून जातो. त्यावेळी कबीर महारवाडयाला आधार देतो. या संकटातून महारवाडयाला बाहेर काढण्यासाठी कबीर गावातील सवर्ण मंडळींनाही भेटतो. तेव्हा ही

सवर्ण मंडळी सुद्धा महारवाडयाच्या या प्रश्नामध्ये त्याला न अडकण्याचा सल्ला देतात. तरीसुद्धा कबीर माघार न घेता आक्काबा राणे यांना भेटून मार्ग काढायचा प्रयत्न करतो. परंतु येथे ही दिशाहीन, मूल्यभ्रष्ट अशा झालेल्या चळवळींमुळे कबीरला महारवाडा वाचविण्याच्या प्रयत्नात अपयश येते. त्याच्या कृतीला यश प्राप्त होत नाही,पण तरीही गवस यांच्या कादंबरीतील पात्रे नीतिमूल्यांचा विचार मांडणे सोडीत नाहीत. उदा.'कळप' मध्ये दिलावर म्हणाला, "सांग तुझ्या सनमाडीकरला. वाच म्हणावं पुस्तक. शंक-याला त्यांनीच गप्प बसवलं होतं नव्हे. आता भोगा म्हणावं फळं. चांगली पाणी घालून मारलीय. मग माझं डोकं अचानक भणानलं. म्हणालो, त्यानं पाणी घालून मारली ह्याचं नाही वाईट वाटत. पण वाईट तुमच्या बुळेपणाचंच वाटतंच. लेको, स्वत:ला लेखक म्हणून मिरवताय, तुम्हाला लिहायलाही येतं. मग तुमच्यापैकी कोण का लिहीत नाही जोगतिणीवर. बाहेरचे येऊन चढून गेले तरी तुमच्या डोक्यात नाही वळवळत हा विषय. हिंमत असली तर दाखवा की लिहून. नाही तर तुम्हालाच सोडूया हिजडे म्हणून ! म्हणे हळदूलकरनं मारली. उघडी टाकून या गडयाऽऽ हाणा जरा, म्हटल्यावर कोण सोडंल? मग दोघेही एकदम गंभीर. बोलायला तयार नाहीत." (पृ.२२४)

राजन गवस यांनी कादंब-यातून सामान्य माणसांचे चित्रण अत्यंत सूक्ष्म तपशिलाने केलेले आहे.'कळप' मध्ये देवदासींच्या प्रश्नांचा विचार करताना रघूने केलेला विचार हा माणुसकीच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो. उदा.'कळप' मध्ये रघू सांगतो,"एक गाव संपल्यावर दुसरं गाव. सारखं सारखं तेच ते ऐकणं. कोण नवसासाठी यल्लामाला सोडलेली तर कोण डोक्यात जट झाली म्हणून. कोण गादी चालवायला तर कुणाचं लगीन होत नव्हतं म्हणून. सगळ्याच अतृप्त आणि कोंडलेल्या. प्रत्येकीच्या डोळ्यात नवं दु:ख, नवी खदखद. त्यांच्या पदराआड लपलेल्या शरीराचे हुंदके, कुणाची निढावून गेलेली मानसिकता तर कोण स्वत:तच कुढत बसलेली. कुणाला चोरटया सुखाची सवय लागलेली तर कोण राजरोस पुरूष ठेवून घेऊन जगणारी. कोण जगण्याची हिंमत हरलेली तर कोण सूड म्हणून प्रत्येक गोष्ट बिनधास्त करणारी. एक ना हजार प्रकारच्या बायका. चार दिवसात माझ्या मेंदूचा

भुगा झाला आणि देव किळसवाणा वाटाय लागला. च्यामायला, किती होतो आपण आडणचोट !"(पृ. ४३-४४)

देव,धर्म,जात,वर्ण,वर्ग,देश,राष्ट्र या सर्व संकल्पना,व्यवस्था मनुष्याने आपल्या विकास प्रक्रियेत निर्माण केल्या,परंतु त्या जर माणसाचा विचार करणा-या नसतील अथवा माणुसकीच्या मूल्यांना पायदळी तुडविणा-या होत,मनुष्याला असुखकारक ठरत असतील,वस्तुरुप होत मनुष्याचे मूल्य ग्रासून टाकत असतील तर तेथे पुन्हा त्यांचा पुनर्विचार केला पाहिजे हे गवस यांच्या कादंबरीतून पुन:पुन्हा सांगितले जाते व ते मनुष्यत्वाच्या मूल्याची प्रतिष्ठापना करु पाहतात. उदा.'कळप' मध्ये,रघू सांगतो,"शिरगावकर,वाचलेलं बडबडायची मला सवय नाही.ही पहिली गोष्ट.आणि स्वत:च्या विचाराबाबत म्हणाल तर ही कथा राहू दे बाजूला पण मला ह्या देशातला मुसलमानही हिंदूइतकाच जुना वाटतो. ह्या देशावर तुमचा जेवढा अधिकार आहे तेवढाच ह्या देशातल्या मुसलमानांचाही आहे. मग त्यांना हाकलण्याची भाषा करण्यात काय अर्थ? आणि मुसलमान जेवढे धर्मांध आहेत तेवढेच हिंदूही आहेत. हे स्वीकारायची तयारी ठेवा.उलट दिलावर सारख्यांनी मी या देशाचा मुसलमान नागरिक आहे,तुमच्या इतकेच या देशावर आमचेही प्रेम आहे.अशी भूमिका घ्यायला पाहिजे."(पृ.८०) येथे रघूची माणुसकीवर भर देणारी भूमिका दिसून येते.

- **२)मूल्यविषयक दृष्टिकोनातील 'देशीयता':**

'देशीवाद' ही संकल्पना भालचंद्र नेमाडे यांनी मराठी साहित्यविश्वात मांडली आहे. नेमाडे देशीवादाला सैध्दांतिक प्रणाली मानण्यापेक्षा एक जिवंत व्यवहार म्हणून पाहतात. देशीवाद ही केवळ साहित्य संकल्पना नाही हे त्यांनी ठामपणे बजावले होते.भारतातील बहुजन आणि अभिजन जीवनव्यवहारामागील सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय बाजूंचा विचार करताना त्यामागे फुले-आंबेडकर-गांधी आणि लोहिया यांचेही विचार उभे आहेत. विदेशी वसाहतवाद्यांबरोबर साहित्याचे झालेले ब्राह्मणीकरण आणि त्याच्याशी आंग्ल वसाहतवाद्यांशी झालेली हात मिळवणी यामधून देशी साहित्याची झालेली

गळचेपी,त्यांनी आपल्या निबंधातून स्पष्ट केली आहे. त्यासाठी 'देशीयता','देशीपणा आणि 'देशीवाद' या संकल्पना मांडून त्याचे स्पष्टीकरण केलेले आहे.

"जागतिक ठरलेले दांती-शेक्सपिअर वगैरेसुध्दा मुळात अत्यंत देशी लेखक होते आणि ते जागतिक ठरण्यामागे त्यांच्या समाजाची बलाढ्य साम्राज्ये कारणीभूत आहेत. एरवी कोणत्याही थोर लेखकात निद्रिस्त जागतिक होण्याचे सामर्थ्य असतेच. कुठलीही साहित्यकृती,पुतळा,चित्र,संगीत आपापल्या परिसराशी,स्थलकालाशी अतूटपणे जोडलेली असते.तिच्यातील शैलीतत्त्वे रुपबंध,आकृतिबंध आपल्या जन्मदात्या स्थळकाळाच्या खुणा अंगावर घेऊनच अस्तित्वात येतात."(१३) "देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे.भारतीय इतिहासात एखाद्या वंशाच्या लोकांना जन्मानेच दास ठरवून किंवा अस्पृश्यतेचा अदृश्य तुरुंगच उभारुन गुलामीचे जिणे लादले गेले, ते केवळ परसंस्कृतीने इथल्या मूळच्या संस्कृतीवर केलेल्या जुलमाचेच फलित आहे.जगभरात काही समान तत्त्वे सापडतात.पण ही समानता त्या त्या देशी वैशिष्ट्यांशिवाय अस्तित्वात आलेली नसते." (१४)

पाश्चात्य प्रभावाचा मराठी साहित्यावर पोषक आणि उपकारक परिणाम झाला तसा एकांगीही परिणाम झाला हे नेमाडे यांनी दाखवून दिले आहे व त्यामधूनच आपली स्वत:ची प्रमाणके टिकवून ठेवणे आणि निर्माण करणे,आधुनिकतेच्या प्रक्रियेत ही भूमिनिष्ठ संस्कृतीशी स्वत:ला जोडून घेणे आणि तिचा विकास करणे हे ही इथे अभिप्रेत आहे.

नेमाडेंच्या या विचारव्यूहाचा मराठी साहित्यावर मोठाच प्रभाव पडला.तिचा स्वीकार आणि नकार या दोन्हीही प्रक्रिया त्या संदर्भात घडल्या. कादंबरी विश्वात सामाजिक वास्तववादाचा स्वीकार,देशीसंस्कृतीतील सूक्ष्म घटकांशी नव्याने झालेली जाणीव,परंपरेचे आधुनिक आकलन,कादंबरीच्या रुपबंधातील मुक्तपणा,लोकसाहित्याशी निर्माण झालेला अनुबंध,लेखकाचे नैतिकभान,दैनंदिन व्यवहारातील बोलींना मिळालेले सर्जनशील रूप या घटकांचा कमी अधिक प्रभाव नव्या लिहिणाऱ्या लेखकावर पडलेला दिसतो. राजन गवस यांच्या कादंबरी लेखनावरही नेमाडे यांच्या भूमिकेचा प्रभाव अनेक

घटकांमधून पाहता येतो. प्रस्तुत प्रबंधात समाजचित्रण या प्रकारणात आपण त्यातील भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांचा विचार केलेला आहे.त्या व्यतिरिक्त आणखी काही घटकांचा विचार करता येणे शक्य आहे.

राजन गवस यांच्या कादंबरीत विशिष्ट भूसांस्कृतिक क्षेत्रामधील विविध जाती,जमाती,देशीय परंपरेतील परंपरा,रूढी,संस्कार,विधी यांचे चित्रण येते.आधुनिक काळातील बदलत्या युगप्रवृत्तींशी त्यांचा होणारा संघर्ष,समन्वय,तडजोड त्यातून चित्रित केली जाते. या सर्व चित्रणामागे ही गवस यांच्या कादंबरीतून देशीय संस्कृतीतील मूल्यविषयक दृष्टिकोन प्रकट होतो.त्यांच्या 'चौंडक' ते 'तणकट' पर्यंत एक सतत विकसित होणारे सूत्र ही दिसून येते व ते या देशीय संस्कृतीत घडणाऱ्या अनेकविध प्रक्रियांचा शोध घेते. ही देशीकरणाची प्रक्रिया नैतिकतेत अंतर्भूत असते. कादंबरीकाराला जेथे वास्तव्य करत असतो, त्या एकूण भूमिपरिसराचे भान त्याला ठेवावे लागते. त्या परिसरातील जाती, जमाती, वंश, संप्रदाय, धर्म यांचा स्थलकालासह विचार करणे आवश्यक असते. त्याबद्दल किशोर सानप म्हणतात, "कादंबरीकाराचे आणि कादंबरीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी देशीयतेचे भान असावेच लागते."(१५)

हे देशीयतेचे भान राजन गवस यांनी जपलेले दिसते. त्यांनी कादंबऱ्यातून चित्रित केलेला तो परिसर, तेथे राहणारा मानवसमूह, त्यांची संस्कृती यांना महत्त्व दिले आहे. नेमाडे यांच्या मते, "साहित्य देशी असणे ही साहित्याची मूलभूत गरज आहे." त्याप्रमाणे गवस यांच्या कादंबऱ्यातून देशीयता ही दिसून येते. 'चौंडकं' पासून 'तणकट' पर्यंतच्या कादंबऱ्यांमधून साकारलेला प्रदेश हा जिवंत वाटण्याचे कारण देशीय मूल्यांना दिलेले महत्त्व आहे. उदा. 'तणकट' मध्ये "बेंदूर दोन दिवसावर येऊन ठेपलेला होता. यावर्षीची कर जगदाळ्याच्या घरात म्हंटल्यावर सगळी पळापळ एकटया भरमूनानालाच करावी लागत होती. त्यात यावर्षी कुठल्याच म्हाराला बैलाच्या दोरीला हात लावू द्यायचा नाही असं सगळ्यांच्या मतानंच ठरलेलं होतं. दरवर्षीच्या करीला दोन दोऱ्या म्हारांच्या हातात आणि दोन दोऱ्या मांगांच्या हातात हा रिवाज पडून गेलेला होता. पण परवाच्या वाटा बंद

प्रकरणात सगळ्यांचीच डोकी इस्कटलेली होती. आधी आपुल्या म्हाराचं प्रकरण, लगेचच बायकांच्या नावावर खोटी केस म्हटल्यावर सगळीजनच चिडून बसली होती. त्यामुळं म्हाराला करीला हात लावू द्यायचा नाही हे आता गल्लीतलं बारकं पोरगंही बोलत होतं.

करीला बांधायसाठी भरमूनानानं घरच्या गाईच्या पाडयाची निवड केली होती. गेली दोन महिने घराच्या गोठयात अंधारी खोली करून त्याला भरडा सुरू केलेला होता. गावात करीची मानकरी पाच खुटाणी. त्यात जगदाळे, राणे, देसाई आणि पाटलांची दोन घरं. त्यामुळं आलटून पालटून या पाच घरातच करीचा बैल बांधला जायचा. आणि गावातल्या इतर लोकांच्या दृष्टीनं तेच फायद्याचं होतं. नाही म्हटलं तरी दोन महिने बैल बांधायचा म्हणजे त्याला हरहुन्नरी खाद घालायला लागायची. हारभ-यापासून ते जुंधळ्याच्या खिचडीपर्यंत त्याला नानाप्रकारची खाद जगदाळे, राणे, देसाई आणि पाटलांनाच परवडणारी होती. गरीबाला हे सोसण्यातलं काम नव्हतं. आणि पुन्हा बेंदरादिवशी दोन-तीन हजाराचा खर्च. म्हणजे कंबारडं मोडायचंच काम होतं पण ही पाच घरं हौशेनं बैल बांधायची आणि हात सैल सौडून खर्च करायची. त्यामुळं चार खेडयातले लोक बेंदरादिवशी फक्त कर बघायला यायचे." (पृ.१६१-१६२)

'धिंगाणा' मध्ये चेअरमनला म्हातारी सांगते, "धोंडी पाटील व्हता तवा बायका वाडयावरनं जातानंबी चपल्या हातात घीवून जायच्या. रस्त्याला दिसला तर पाटमो-या व्हयाच्या. गडी शब्दाचा इमानी. गाव शब्दाचं ताबेदार. आनी आता काय रंऽऽ हे ? हागाय बसलेल्या बायका हालत न्हाईत. त्ये भाडे पुढारी झाल्यातऽऽ मातीत गेलं पुढारीपण !"(पृ.२२५) यातून गावातील लोकांकडून पाटीलला मिळणारा मान. आता बदललेली परिस्थिती दिसून येते. तसेच 'कळप' मध्ये रघू याला आपल्या देशीय तत्त्वांचा, मूल्यांचा -हास ठिकठिकाणी दिसून येतो. तेव्हा त्याच्या मनात असलेली देशीयता, तो मांडताना दिसतो."सगळे पांगल्यावर सर म्हणाले, आपल्या साहित्याचे सगळे फॉर्मस् खरोखरीच उपरे झाले, आपलं असं काहीच नाही. कविता कथा-कादंबरी, नाटक सगळंच उपरं. मी म्हणालो, ह्याला कारण आमची मातीपासून तुटलेली वाङ्मय संस्कृती, ग्रामीण-

दलितवाल्यांनी खरं वास्तविक हे सगळं बदलायला पाहिजे होतं. म्हाराघरी गाणं होतं. त्याचा विचार दलित लेखकांनी केलाच नाही. उलट ते ब्राह्मणी कविता लिहून पुळचट विद्रोह व्यक्त करत राहिले आणि ग्रामीणवाले तर एकदम गांडू निघाले.

सर माझ्याकडं अविश्वासानं बघाय लागले. म्हणाले, हे तू नेमकं कशात वाचलास ? च्या आयल्या, म्हणजे ह्या माणसालाही माझी गॅरंटी नाहीच. मग जोरात हसलो तर ते माझी समजूत काढाय लागले." –(पृ. ७०)

वसाहतवादने देशीय संस्कृतीतील माणसांच्यात निर्माण झालेली स्वसंस्कृती विषय अवहेलनेची,न्यूनगंडाची भावनाही माणसांच्या अस्तित्त्वाला, माणुसकीच्या भावनेला कमी लेखणारी ठरते. गवस यांच्या कादंबरीत अशात–हेच्या एतद्देशीय वसाहतवादी मानसिकतेचे चित्रण येते व ते माणुसकीचे एकंदर मूळच देशीय परंपरेत मांडण्याचा प्रयत्न करते. आपल्या संस्कृतीवर झालेल्या परकीय संस्कृतीच्या आक्रमणाने आपला येथील सुसंस्कृत समाज आपल्या संस्कृतीला मागासलेला समजू लागला. आपल्या संस्कृतीमध्ये आपले राहणीमान, आपली भाषा, आपला पेहराव यांचा समावेश होतो त्याची निंदा केली जाऊ लागली. येथील सुसंस्कृत लोकांना इंग्रजी संस्कृती श्रेष्ठ वाटून आपली देशी संस्कृती कनिष्ठ वाटू लागली. गवस यांनी 'कळप', 'तणकट' मध्ये देशीयतेचा केलेला पुरस्कार स्पष्ट दिसून येतो. उदा.'कळप' मध्ये रघूने मांडलेली देशीयते बद्दलची प्रतिक्रिया अशी आलेली आहे,"तांबट आणि मी जगू भोसल्याच्या घरात पोहचलो. तेव्हा ब–याच मंडळींची हजेरी लागलेली. हिराचंद कलवाणी होताच. नुसत्या लिक्विडवर राहणा–या प्राध्यापक गुणपुलेची तांबटनं पहिली ओळख करून दिली. रणखांबे नावाचे गृहस्थ इंग्रजी मासिकावर चर्चा करत होते. जगूची धावाधाव चाललेली. म्हणजे आज नेहमीसारखाच कार्यक्रम दिसतोय. फुक्कट आलो पळापळ करून. जगू एकदम खूष होऊन गेलेला. तांबट ह्या सगळ्यात अगदी चटकन मिसळला. म्हणजे शहर माणसाला इतकं बदलवत असेल की तांबटच असा पटापट बदलवून घेणारा आहे. नेमकं काय ? तांबट कॉलेजात भलताच ताठर. असा लवचिक बनवायला कारण कोण ? असं बरंच काय काय मनात चाललेलं. अशात रणखांबे

माझ्याजवळ येऊन बसला. म्हणाला, तुझ्यासह बैठक व्हावी अशी फार दिवसाची इच्छा होती. तुझी बेबी मला भयंकर आवडली होती. मग माफल हसलो. आपण सावरून वागायचं असं मी ठरवून टाकलं. अलीकडं डोकंच जाग्यावर नव्हतं. त्यामुळं असं ठरवणं गरजेच होतं. रणखांबे आपल्या हातातील इंग्रजी मासिक माझ्या हातात देत म्हणाला, हे बघ, हे इंग्रजी मासिक, काय भन्नाट छापलंय. बघत रहावं. काय कागद, काय छपाई, ले-आऊट तर विचारूच नका. नाही तर आपले लोक मासिकं छापतातच. काय घाणेरडी ! एका बाजूला छापलेलं दुस-या बाजूला स्पष्ट दिसतं. याला काय छपाई म्हणायची ? अत्यंत घाणेरडी ! हातात धरवत नाहीत मासिकं. काहीही म्हण आपल्या माणसांना कलात्मक दृष्टीच नाही. फडतूस.

मी म्हणालो, चालायचंच. ज्या त्या माणसाला प्रदेशाच्या मर्यादा असतात. स्वभाव मातीवर उभारत असतो.

तो म्हणाला, ते खरं असलं तरी बदललंच पाहिजे माणसांनी. आता ह्या तांबटाला किती वेळा सांगतो, थोडी भाषा बदल. तरी आता बरी झालीय त्याची भाषा. पण आपल्याला काहीही स्वीकारायला थोडं जडंच जातं.

मी म्हणालो, हा ज्याच्या त्याच्या वकुबाचा प्रश्न असतो." (पृ. २७१)

'कळप' मध्ये रघूने आपल्या देशीयते बद्दलच्या प्रतिक्रिया देताना ग्रामीण साहित्य आणि म.फुले यांचा अतूट संबंध सांगितला आहे. उदा. कलावतीबाई म्हणाल्या, तो परिसंवाद आहे आणि विषय आमच्या मिटींगमध्ये फायनल झालाय - ग्रामीण साहित्य किती खरं किती खोटं.

मी म्हणालो, आपल्याकडं ग्रामीण साहित्यच नाही आणि तुम्ही ख-या खोटयाचं हे काय लावलंय ? उलट म.फुले आणि ग्रामीण साहित्य असा विषय ठेवा पाहिजे तर. म्हणजे निदान फुल्यांनी मांडलेल्या विचारांना स्वीकारल्याशिवाय ग्रामीण साहित्य निर्माणच होऊ शकत नाही हे तरी लिहिणा-यांना कळेल.

पानके चटकन म्हणाला, काय कळतंय म्हणून बोलाय लागलास की उगीचच ? मुळात फुल्यांनाच लेखक मानायला आमच्याकडं अडचणी आहेत. मग त्यांचे विचार आणि ग्रामीण साहित्य यांचा संबंध कसा काय जोडायचा. आणि अशा विचारावर बोलणार तरी कोण ?

तर दिलावर इतक्या मोठयानं हसला की पानके दचकलाच. भादवणकर महाजनसरना म्हणाले, सर ही काय चेष्टा चालवलीय. तुम्ही तरी सांगा या दोघांना. नाही तर आम्ही तरी उठून जातो.

दिलावर म्हणाला, आहो, तुम्ही काहीही आडाण्यासारखं बोलाय लागल्यावर हसायचं नाही तर काय करायचं ? फुलेंचा आणि ग्रामीण साहित्याचा संबंध नसेल तर काय मग गोळवलकर गुरूजींचा आणि ग्रामीण साहित्याचा संबंध आहे. हे तरी आम्हाला समजून सांगा.

कलावतीबाई म्हणाल्या, ग्रामीण साहित्यात आता पाचवी पिढी लिहायला लागलीय. त्यांच्या साहित्याचा आणि फुलेंचा मुळी संबंधच नाही. आपण त्यांच्याबाबत विचार करायचा का शंभर वर्षापूर्वीच्या फुलेंचा विचार करायचा. आणि फुलेंवर राजकीय, सामाजिक व्यासपीठावर बोलतातच की. पुन्हा साहित्याच्या व्यासपीठावर त्यांचा संबंध कशाला आणायचा.

दिलावर म्हणाला, तुम्ही चळवळ चालवणारे एवढे आडाणी आसाल असं वाटलं नव्हतं. मला तर आता उबगच यायला लागली तुमच्या साहित्य संमेलनाची. रघू म्हणाला तसं खरोखर समारोप घेऊन टाका."(पृ.३७६) इतकेच नाही तर बोलीभाषेबद्दलचे आपले मत कबीर आणि बल्लाळने 'तणकट' मध्ये मांडले आहे. कबीर सांगतो,"बल्लाळ, तुझं-माझं नेहमीच चाललेलं असतं. पण यांची आत्ताच ओळख करून दिलायस. त्यांच्याशीच आपण बोललो तर कसं होईल."

"काही का असेना. पण तुझ्या भाषेत आता फरक पडत चाललाय. थोडयाच दिवसात तू मध्यमवर्गीय होशील."

बल्लाळनं पुन्हा टोमणा मारला.

"च्या आयलाऽऽ गावठी बोललं की तुझी भाषा नाही सुधरायची'. आणि पुस्तकी बोललं की मध्यमवर्गीय झाला. म्हणजे मी बोलू कसा ? ते एकदा सांगून टाक."

"हांऽऽ तो एक मुद्दा आहेच. एकदा असा प्रयोग करून बघऽऽ गावात शुद्ध बोलायचं आणि कॉलेजात पूर्ण गावठी बोलायचं."

"म्हणजे गावात पायताण पडू देत आणि कॉलेजात तू दात काढायला रिकामा. बल्लाळ, तसं मी ब-याच वेळा करत असतो. पण तुझ्याइतकं नाही जमत."

"नाही जमणार ना ? कसं जमेल. माझा बाप मास्तर आहे. त्याच्याशी कसरत करताना हे सगळं जमत गेलंय. कसं म्हणतोस' म्हणत बल्लाळ एकटाच हसत राहिला." (पृ. १८२)

राजन गवस यांच्या सर्व कादंब-यामधून देशीय मूल्यांचा खोलवर संस्कार दिसून येतो. या कादंब-यातील नायक आपल्या देशीय मूल्यांना जपणारी आहेत. परकीय संस्कृतीच्या प्रभावाचा ते विरोधही करतात. इंग्रजी भाषेला दिलेले महत्त्व. शुद्ध मराठी भाषेचा आग्रह. ग्रामीण साहित्यात येऊ लागलेले उपरेपण दिखाऊपण, याच्या बद्दल मांडलेल्या प्रतिक्रिया 'कळप' मध्ये दिसून येतात. तसेच कॉलेज शिकणारी मुले गाई, म्हशी चरायला नेणे शेतीची काही कामे करणे, बोलीभाषेत बोलण्याचा आग्रह ठेवणे. ग्रामीण साहित्याची मुळे कशात आहे. ते दाखविणे इ. गोष्टीतून आपल्या देशीयतेची जाण 'धिंगाणा', 'कळप','तणकट' मधून हे नायक दाखवून देतात. त्यामुळे हे नायक आपल्या जीवनदृष्टीमध्ये देशीयता बाळगताना दिसतात. मराठी साहित्यात असलेल्या अ-नैतिक व्यवहार, प्रवाह यावर आपल्या प्रतिक्रिया हे नायक देतात. मराठी साहित्याची ग्रामीण साहित्याची उज्ज्वल परंपरा सांगतात. आपल्या येथील चळवळींमध्ये येऊ लागलेली विकृती, त्यामुळे समाजात सवर्ण व अन्य जातीमध्ये वाढलेली वैरभावना, त्याला असलेली कारणेही सांगतात.'तणकट' मध्ये कबीर व बल्लाळचा संवादातून चळवळींमधील फोलपणा जाणवतो. बल्लाळ म्हणतो,"कबीर, जो तो आपापल्या प्रवृत्ती आणि प्रेरणेप्रमाणे जगत असतो. आणि त्यानं त्यानं तसं जगत जावं. कारण तेवढा एकच पर्याय ज्याच्या-

त्याच्याजवळ शिल्लक असतो. शेडबाळे गेला म्हणून बनसोडेला पुन्हा भांडवल मिळालं. तो पुन्हा एखादा मोर्चा काढेल. पुन्हा धरणे. पुन्हा फोटो. पुन्हा प्रसिद्धी. पुन्हा पैसा. ही त्याची गती आहे. तो त्याच्या गतीने जाणारच. आपण त्याला काहीच नाही करू शकत. आणि कशाकरता त्याच्यावर शक्ती खर्च करायची ? त्यासाठी आपला जन्म नाही. आपण त्याला सुधारण्याचं किंवा ठार मारण्याचं कॉन्ट्रॅक्ट घेतलेलं नाही. मग विचारच कशाला त्याचा ?"(पृ.२३८)

राजन गवस यांच्या 'चौंडक' ते 'तणकट' या सर्व कादंब-यांना देशीयतेचा स्पर्श लाभलेला आहे. या कादंब-यामध्ये माणूस आणि समाज यांचे असलेले परस्परसंबंधांचे गुंतागुंतीचे मांडलेले आहे. यामध्ये लोककथांचा वापर, त्या परिसरातील रूढी परंपरा, शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील वास्तविकता, साहित्यातील अनेक विषयांवर चर्चा, भारतीय समाजातील मुस्लिम वर्ग आणि दलित वर्ग यांच्याबद्दल असलेले स्पष्ट विचार, जातीयतेचा अनेक बाजूने केलेले विचार, विविध पात्रांद्वारा मांडले गेलेले विविध दृष्टिकोन, त्यांच्या कादंब-यातून व्यक्त होतात महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील परिसराचे चित्रण त्यांच्या भूसांस्कृतिक विशेषांसह, तेथे चालणा-या सामाजिक चळवळी या सर्वांसह देशीय तत्त्वांचा विचार त्यातून व्यक्त झालेला आहे.

## (आ) स्त्री विषयक दृष्टिकोन :

गवस यांच्या कादंब-यात विविध स्तरावरील स्त्रिया आलेल्या आहेत. समाजा चित्रणाचा पट आपल्या कादंब-यातून निर्माण करताना त्यात विविध जातीवर्गातील स्त्रियांचे चित्रण आलेले असले तरी नायक नायिका असे रुढ पारंपरिक संकेत त्यात नाही. 'चौंडकं' मध्ये तो थोडा फार आला असला तरी सुलीची वेदना व देवदासीसमूहाचे चित्रण हेच तेथे केंद्रस्थानी येते,परंतु त्याव्यतिरिक्त त्यांच्या कादंब-यातील स्त्रीचित्रण हे समाजचित्रणाच्या अनुषंगाने येते. सामाजिक वास्तववादी चित्रणाने त्यातील स्त्रिया रोमॅंटिकतेला छेद दिल्याने,त्यात कुठेही स्त्रीविषयक भावनेचे अतिरंजित,भडक,कृत्रिम अथवा उसने स्वरुपाचे चित्रण नाही. त्यामुळेच त्यांच्या कादंबरीत स्त्रियांच्या देहाची,हालचालीची,त्यांच्या

वेषभूषेची,राहण्यासाहण्याची वर्णने फारशी येत नाहीत.स्त्रियांच्या कृतिउक्तीतून त्या आणि आवश्यक तितक्या अवकाशात त्यातील स्त्रियांना जागा मिळते.उदा. 'चौंडकं' मध्ये सुलीच्या हालचालीचे वर्णन,"सुलीनं पाण्याच्या घागरी मोकळ्या केल्या.बाबाच्या फाटक्या अंगीची चुंबळ केली.घागर काखंत मारली.दुसरी हातात घेऊन तिनं उंबरा वलंडला.पाण्याच्या वाटंला कोण किण नव्हतं. सुलीला कसंतरीच वाटलं. ती तिच्याच तालात चालायला लागली.... सुलीला रानाकडं बघत बसावं असं वाटाय लागलं.तिनं –हाटाची साखळी वडता वडता पाण्यात डोकावून बघितलं.पाण्यातलं तिचं रुप तिलाच भलतं गोड वाटाय लागलं. ती पाण्यातल्या आपल्या रुपाकडं बघतच –हायली."(पृ.७८) असे आले आहे. 'तणकट' मध्ये रामा म्हाराची बायको सुलीच्या राहण्यासाहण्याचे वर्णन,"सुली रामा म्हाराची बायको.रंगानं काळी सावळी असली तरी ठेवण तशी उजवीच होती. लग्न होऊन म्हारवाड्यात आली तेव्हा आडदांड रामाला बायको मात्र फैना मिळाली,अशी चर्चा सगळ्यांचाच तोंडात होती. लग्न झालं तेव्हा साधारण किरपण असणारी सुली लग्नानंतर सहा महिन्यात हळूहळू बदलत गेली. फाटक्या–तुटक्या लुगड्यातूनही तिचा बांधा तसा उठूनच दिसायचा.खायला–प्यायला नसणा–या घरात जरी ती पडली असली तरी राबायला चांगली खवाट होती."(पृ.३१)असे आलेले आहे. परंतु येथे हे ही नमूद केले पाहिजे की त्यांच्या कादंबरीत एकही स्त्री व्यक्तिरेखा प्रधान स्वरुपात आपल्याला दिसत नाही. रघू,चेअरमन,कबीर या समाजनिरीक्षक प्रधान नैतिक दृष्टिकोन व भूमिका असलेल्या नायकाप्रमाणे एकही स्त्री व्यक्तिरेखा येथे येत नाही. यातील बहुतांशी स्त्रियांचे चित्रण शोषित वर्ग या पातळीवर सहानुभूतीने अथवा समाजभ्रष्टतेच्या प्रातिनिधिक स्वरुपात आलेले दिसते. सामाजिक वास्तववादी प्रवाहात लेखन करताना एकाही स्त्रीच्या मानसिक,भावनिक वास्तव स्वरुपा पातळीवरील चित्रण तिला केंद्रस्थानी ठेवत लेखकाने केलेले दिसत नसल्याने ती काहीशी मूक स्वरुपात,समूह स्वरुपात अधिक आलेली दिसते.

राजन गवस यांच्या 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब–यांमधून विविध स्त्रीपात्रे आलेली आहेत. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

१) ग्रामीण पातळीवरील स्त्रिया

१.१) देवधर्माच्या परंपरेत अडकलेल्या स्त्रिया

१.२) सामान्य जीवन जगण-या स्त्रिया

१.३) राजकारणातील स्त्रिया

१.४) घराबाहेर पडून श्रम करणा-या स्त्रिया.उदा. सुशिक्षित स्त्रिया, अशिक्षित स्त्रिया

२) गावपातळीवरच्या किंवा शहर पातळीवरच्या स्त्रिया

२.१) कॉलेजमधील विद्यार्थिनी, शिक्षिका

२.२) साहित्यिक वातावरणातील स्त्रिया

२.३) राजकारणातील आणि सामाजिक चळवळीतील स्त्रिया

## १) ग्रामीण पातळीवरील स्त्रिया

### १.१) देवधर्माच्या परंपरेत अडकलेल्या स्त्रिया:

- **अ) देवधर्माच्या, परंपरेच्या बळी झालेल्या स्त्रिया (जोगतिणी):**

  'चौंडकं' - (जोगतिणी) – सुली, शेवंताक्का ,शांता बाई , गंगूबाई , तानू जोगतीण, रत्नी (महाराची), येसाद्याची फुला, तायाक्का, तंगव्वा, मंगव्वा, इ.

  'भंडारभोग'- (जोगतिणी) – तानू सुतारीण, देववाली शेवंता, आक्कव्वा, महार फुला, जाधवाची पारव्वा, लिकमाची म्हातारी, गोडश्याची लक्ष्मी, मस्करची रत्नी, मल्लव्वा, मांगाची रकमी, लकाण्णाची तंगव्वा, कमळा, सुंदर,लल्लव्वा,गंगव्वा,इमला(बाळ जोगतिण) इ.

  'धिंगाणा' – (जोगतिणी)-सकरू भंडारीन

  'कळप' – (जोगतिणी)- सत्तव्वा,कमळा, गोजाबाई , बेबी, देववाली शेवंता इ.

- **ब) अंधश्रध्देच्या,परंपरेच्या आहारी गेलेल्या स्त्रिया:**

  'चौंडकं' - बायजा, सुलीची आजी, मावशी,गावातल्या अनेक स्त्रिया,खरंदाळची बायको, घोरपडेची बायको इ.

'भंडारभोग' – तायाप्पाची आई, कल्लव्वा, आत्या गौरव्वा, शिंद्याची बायजा, आक्कू मानीन, दादू पाटलाची बायको, कासाराची कमळा, शांता पाटील इ.

## १.२) सामान्य जीवन जगणा-या स्त्रिया :

'चौंडकं' – सुलीची मावशी, सुलीची आईची आई, मामी, सुनंदा, शिंद्याची म्हातारी, शिंद्याची गंगू, सोनाराची जना, कमळा म्हातारी, मगदुमाची कल्पी, सुताराची कमळी, हाळ्याची शेवंता, गोदामोटीन, कसाळ्याची लक्ष्मी, मान्याची चांगुणा, मान्यांची सुसा, पाटलांची सखू, गुणवंता,शिंद्याची बायना, गोडश्याची नानू, न्हाव्याची म्हातारी, मान्याची शांता, पाटलाची गोंदा, लक्ष्मी कसाळीन

'भंडारभोग' – आक्कवा, शिंद्याची बायजा, न्हाव्याची जनाक्का, कसाळ्याची गंगव्वा, यरगुंड्याची सुंदरा, किसना आजी, फुलाची आई, कोंडकरची लक्ष्मी, घोरपड्याची म्हातारी, गोडशाची लक्ष्मी, मस्करची आक्क ाव्वा, मिसाळची म्हातारी, गोदामोटीन, यरगड्याची म्हवना, तंगव्वाची बहिण (म्हातारी), दादू पाटलाची बायको, मगदुमाची म्हातारी, सुंदराकाकू, सुताराची हौसा, शिद्याची म्हवना, आक्कुमानीन, गोडशाची कमळा.

'धिंगाणा' – चेअरमनची आई, बाबल्याची आई, सुमी, म्हवना, म्हातारी ,काशव्वा साळनी, धोंडू अजी, कान्याची काकू, संब्याची आई, कासू आजी, तायाना काकू, शिवू कतगारीन, गुना न्हावीन शांता मामी, गुंड्याची म्हातारीम तांबडी काकू.

'कळप' – रघूची आई, बायना, सिकल्याची आई, कमळी, शेवंता, दादाची आई, रघूची बहिण, भीमा दिवट्याची बायको, महागावकरांची मुलगी

'तणकट' – शेडबाळेची आई, शेडबाळेची बायको, तानू आजी (दलित), सखू म्हातारी, राधा वयनी, देववाली शेवंता, थळबाची हौसा, गौरा सुतारीण, सकटीनी, कसाळीण, साळोखे वकिलाची बायको.

## १.३) राजकारणातील स्त्रियाः

'धिंगाणा' – बायना शिंदे, ताराबाई , रानबाची बायको, तायाक्का

## १.४) घराबाहेर पडणा–या स्त्रिया:

- अ) सुशिक्षित स्त्रिया

'धिंगाणा' – खंडेबाई , भोसलेबाई

- ब) श्रमिक स्त्रिया

'चौंडकं' – सुली, बायजा, निकमाची लक्ष्मी, ढगा–याची हौशी, सुनंदा, कणश्याची बायको, खोरट्याची कमळा, सुताराची पारू, कसाळ्याची तानू.

'भंडारभोग' – कल्लव्वा, आक्कवा

'कळप' – रघूची आई, बायना, सिकल्याची आई

'तणकट' – किसना शिंद्याची बायको,तारा, तानक्क, कमळव्वा, जनाक्का,आक्कावा,पुतळा काकू, गुणाकाकू, खांबलीनी,बाळबाची बायको,इळक्याची भिमरा, सकटाची सून, सिदबाची बायको.

दलित – कबीरची आई, सगुणा, सुली, फुला

## २) गावपातळीवरच्या किंवा शहरपातळीवरच्या स्त्रिया:

### २.१) कॉलेजमधील विद्यार्थिनी, शिक्षिका

'कळप' – (विद्यार्थिनी) – गौरी, गीता, सत्त्वव्वाची मुलगी

'तणकट'– सोरटेबाई ( शिक्षिका), दीक्षित गुरुजीची मुलगी

### २.२) साहित्यिक वातावरणातील स्त्रिया

'कळप'– सुलभा, अपर्णा संगवई, छबू हंचनाळे, कलावती चित्रगार, नंदा करजगावकर

### २.३) राजकारणातील आणि सामाजिक चळवळीतील स्त्रिया

'कळप' – गौरी, सत्त्वव्वा, तानव्वा, गंगाबाई , शहरातील काही सुशिक्षित स्त्रिया, विप्रबाई

'भंडारभोग'– सामाजिक चळवळी करणा–या काही सुशिक्षित स्त्रिया ( मास्तर यांच्या सभेत आलेल्या )

गवस यांच्या स्त्रियांविषयीच्या दृष्टिकोनात स्त्रीविषयी तिचे कुटुंबात असलेले स्थान या विषयी विचार केलेला आहे.

राजन गवस यांच्या 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यातून ग्रामीण स्त्रीची विविधरूपे आणि तिची दु:खे आलेली आहेत. तसेच गवस यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनांचा विचार केला तर स्त्रीविषयी तिच्या कुटुंबातील, समाजातील स्थानाविषयी ते अत्यंत जागृत दिसतात.

राजन गवस यांच्या 'धिंगाणा','तणकट'या कादंब-यांमधील नायक हे मुलींपासून लांब राहणारे दिसतात.'कळप' मध्ये रघू ला गौरी देशपांडे नांवाच्या कॉलेजमधील मुलीचे आकर्षण असते. गांधी नंतरचा महात्मा हा नेता त्या गौरीला सत्ता प्रतिष्ठा देण्यासाठी सगळ्या कार्यक्रमात पुढे आणत असतो. गौरीलाही हेच हवे असते. हे पाहून रघू गोंधळतो. त्याला असे प्रतिष्ठेसाठी, सत्तेसाठी हे असे वागणे पटत नसते. त्याची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी गंभीर आहे.

गवस यांच्या कादंब-यात आलेले स्त्रीचित्रण, स्त्रीविषयक दृष्टिकोन हे त्यांच्या स्त्रीविचारांना समांतर असेच आहे. कादंब-यातील निवेदनातून समाजात असलेले स्त्रियांचे स्थान त्यांचे घरात असलेले योगदान, त्यांचे जगणे, त्यांचे प्रश्न, त्यांचे सुख दु:ख, त्यांचे होणारे शोषण, अशा अनेक वास्तव घटकांचे चित्रण त्यात आलेले आहे. उदा.'तणकट' मधील ताराचे जगणे असहाय्य होण्याला कारण "बाळासाहेब शेडबाळेच्या पाठीमागं म्हारवाडयातले विविध व्याप लागत गेले. आणि त्याचं गावातल्या घरात थांबणं हळूहळू कमी कमी होत चाललं. बँकेतून सुटला की पहिल्यांदा त्याची स्कूटर घरात यायची. हातपाय धुऊन चहा घेतला की मग मध्यान्ह रात्रीपर्यंत बाहेर असायचा. कधी कधी भगटायला घरात यायचा. पण सकाळी घरात येऊनच पुन्हा त्याचा दिवसाचा कार्यक्रम सुरू व्हायचा. पण आता सगळंच बदललेलं होतं. घराचा उंबरा आठ-आठ दिवस त्याला दिसतही नव्हता. घरात आलाच तर इकडं-तिकडं थोडं करून हवं - नकोची चौकशी केली की गडी पुन्हा उंब-याच्या बाहेर. त्याच्या ह्या वागण्यानं सगळ्या घराचा भार तारावर पडला होता.

शाळेच्या पोरी, घरातली ओढाताण आणि रानातली बारकीसारकी कामं ह्यात तिचा जीव खराशीला आला होता. वयानुसार बाळासाहेबाची आई – आक्क म्हातारी चिडचिड झाली होती. म्हातारी कोणती गोष्ट नावाला ऐकून घेत नव्हती. आणि नको ते उद्योग करून नवीनच दुखणं निर्माण करत होती. परवा बाळासाहेबाची मधली पोरगी-सुमी शाळेतून मध्येच रडत आली. आणि तिनं म्हातारीला सांगितलं – शाळेतल्या पोरी चिडवाय लागलेत. म्हातारीनं खोदून खोदून काय चिडवतात म्हणून विचारलं आणि सुमीनं सांगून टाकलं – तुमचा बाबा म्हार झालाय म्हणत्यात. तशी म्हातारी बिनसली. शाळा सुटायच्या वेळेला पिसुळीची काटी घेऊन शाळेजवळ उभी राहिली. आणि सुमीनं नावं सांगितलेल्या पोरींना झोडपून आली. संध्याकाळी सगळं घर माणसांनी भरलं. गल्ली थट्ट झाली. तारा सगळ्यांच्या पाया पडली. तेव्हा कुठं माणसं दारातून हालली. मग तारानं म्हातारीला चार शहाणपणाच्या गोष्टी सांगायला सुरवात केली तर म्हातारी – तू कालची रांड श्यानपन सांगती काय ? म्हणत अंगावर आली. ताराला ह्या सगळ्याला तोंड देऊन जीव नकोसा झाला होता. गल्लीतल्या बायका तोंडासमोर हळहळायच्या, पण माघारी बाळासाहेब म्हारोडयात राहातो याचीच चर्चा करायच्या. आठ-पंधरा दिवस कुठं तोंड घेऊन जावं म्हटलं तरी तिला जागा नव्हती. सगळे भाऊ आपापल्या संसाराला लागल्यामुळं तिच्याकडं लक्ष द्यायला कुणाला सवड नव्हती. तारानं गावातल्या-गल्लीतल्या जाणत्या माणसांना गाठून तुम्ही तरी चार गोष्टी शानपणाच्या नव-याला सांगा म्हणून उंबरे झिजवले होते. त्या माणसांनी तिला सहानुभूती दाखवली तरी ती मंडळीही हतबल होती. त्यामुळे दिवसेंदिवस ताराच्या स्वभावात विलक्षण फरक पडत चाललेला होता. तिचं गल्लीत जाणं-येणं पूर्ण बंद झालेलं होतं. पोरींच्या कपडयालत्त्याकडं तिचं पहिल्यासारखं लक्ष राहिलेलं नव्हतं. घरातलं कोण जेवलं-राहिलं याची चौकशी तिनं सोडलेली होती. कधीकाळी भक्कम हाडा-मासाची तारा आता तुरकाटी झाली होती. अंगावरच्या कपडयांचंही तिला आता फारसं कौतुक उरलेलं नव्हतं. दिवसभरातं ती जेवण-पाणी आणि इकडं-तिकडं करत घरातच कोंडून घ्यायला लागली होती. घरातून बाहेर पडायचं तिच्या जीववार येत होतं. कुणाशी बोलावं,

मन मोकळं करावं, पोटभरून रडावं ही तिची इच्छाही संपत गेली होती. चेह–यावर एक प्रचंड उदासपण साचत गेलेलं होतं."(पृ.१२१–१२२) असा त्रास सहन करणारी तारा सांगते, "आता तेवढंच –यायलंय. त्येबी करूंदे. म्हणजे सासू म्हणणा–या रांडंलाबी आक्काल ईल. त्यो एकीकडनं आनी ही एकीकडनं. दोघांनी मिळून खंग भाजलाय." ताराला डोळ्यातलं पाणी काय केलं तर आवरेना. मग तिनं डोळ्याला पदर लावला.(पृ.१४८) तेथे फुलाची व्यथा अशी व्यक्त होते,"फुला सुन्न होऊन सर्व पाहात होती. जोरानं ओरडावं एवढंही धाडस तिच्यात उरलेलं नव्हतं. बराच वेळ तिच्या डोळ्यासमोर फक्त अंधाराची वर्तुळं वळवळत राहिली. कुठला असला न्हवरा आपल्याच नशिबाला आला ? एक धड न्हाई. रोज जीवाला कसली तरी किरीकात हायच. मागतकरी तर रोज उंब–याला हाईतच. कुणाला एवढयाला बुढीवलं आनी तेवढयाला बुढीवलं. बुढव्या माझ्याच वाटयाला कसा ? कशा कशाला टक्कर द्यायची ? ह्येनं काढून ठेवल्याली कार्टी संबाळायची ? काय हेच्या भानगडी निस्तरायच्या ? घरात एक पैसा तेलामिठाला दीत न्हाई. मग ह्यो भाडया करतोय तरी काय ? ह्यापरास आसली उलथत का नसतील ?"(पृ.५९)

चेअरमन, कबीर हे नायक प्रेम, आकर्षण यापासून लांब असले तरी त्यांनी लग्न पद्धतीत असलेल्या अनेक चुकीच्या कल्पना यांचा उभा–आडवा छेद घेतलेला आहे. लग्न जुळवताना घराणे, जाती, कुळ याला दिले जाणारे अकारण महत्त्व दाखवले आहे. उदा.'धिंगाणा' मध्ये आलेला एक प्रसंग "काय मुलीला विचारायचं ते विचारा." मामानं आम्हा तिघांच्या तोंडाकडं बघीतलं. बाबल्यानं धाडसानं मामालाच विचाराय सांगितलं.

मामा, नाव, गाव, भाऊ–बहीण याच तपशिलात गुंतला. माझ्या तोंडात कचकून शिवी.

सगळं माहिती असताना विचारायचं काय ?

पण रिवाज. शेवटी मामा थकला. त्यानं संब्याकडं बघितलं. संब्या पोरीगत लाजला.

तसं बाबल्या ढीलं न पडता म्हणालं –"शाळा कितवीत सोडली ?"

पोरगी बोलायच्या आतच पोरगीची आई चौकटीतनं म्हणाली, "सहावीला." बाबल्याची दांडी उडाली. मग बाबल्या पुन्हा बडबडला –

"वाचता येतं का ?"
बाबल्याच्या या प्रश्नानं मात्र मला हसू आवरलं नाही. बाबल्याच्या मांडीवर थाप मारतच म्हटलं –
"सहावी झालीय म्हणजे येत असणारच की –"
"तसं न्हवं पावणं, त्येचं बरोबर हाय" – म्हणतच घेवडया शेंगंगत वाकलेल्या म्हाता–यानं बारक्या पोराला पुस्तक आणाय लावलं. पोरगी न अडखळता वाचू लागली. मी तोंडात रूमाल कोंबून गप्प बसलो. चांगलं पाच मिनटं पोरगी एक पान वाचत बसली. तरीपण कोण थांब म्हणेना, तशी चौकटीला उभ्या असलेल्या पोरगीच्या आईनंच थांब म्हटलं. तोंडातला रूमाल काढून मी सैल झालो. मामानं नजरेनंच उंचीचा अंदाज घेवून पोरगीला चालवून बघितलं. जायला सांगितलं. मला सुटल्यागत वाटाय लागलं..."(पृ.५२)

गवस यांच्या कादंब–यात स्त्री पुरूष संबंधित कामव्यवहाराचे अनेक प्रसंग आले आहेत. हे प्रसंग अत्यंत संयमितपणाने चित्रित झालेले आहे. उदा. सुली –बबन्या, तायप्पा–रत्नव्वा. कादंब–यात हे लैंगिक संबंध कुठेही रंजनवादी घटक म्हणून येत नाहीत तर यातून स्त्रियांच्या सहज सुलभ भावना कारणीभूत झालेल्या दिसतात.

'कळप' मध्ये सामाजिक चळवळीमधील फोलपणा दिसून येतो. शहरात राहणा–या सुशिक्षित आधुनिक पद्धतीची जीवनशैली जगणा–या स्त्रिया गावात येऊन देवदासी सुधारणा चळवळीत भाग घेतात. उदा."अभ्यास पाहणीसाठी आलेल्या बायका सनमाडीकरांच्या बाहेरच्या सोप्यात अघळपघळ पसरल्या होत्या. खुर्चीवर एक दोघी मासिकं चाळत. आतल्या सोप्यातही बायकाच असाव्यात. त्यांच्या बोलण्याचा आवाज येत होता."(पृ.१०५) गवस यांचे चळवळीतील आधुनिक स्त्रियांचे हे चित्रण एका अर्थाने शहरी संस्कृतीतील दिखाऊपणावर केलेले भाष्यच आहे.

शहरात चालणा–या स्त्री मुक्तीच्या चळवळी ग्रामीण भागात उपयुक्त नाही. कारण शहरी पातळीवरील स्त्रियांच्या समस्या आणि ग्रामीण पातळीवरील स्त्रियांच्या समस्या

वेगळ्या आहेत. हे शंक-या सांगतो. शंक-या म्हणाला, शंक-या म्हणाला, सर, ह्या विप्रबाई नेमकं करत्यात काय म्हणायच्या ?

सनमाडीकर त्याच्याकडं बघून हसाय लागले. तरी त्याचा तोच प्रश्न. मग म्हणाले, "काय म्हणजे ? स्त्रीमुक्तीची चळवळ चालवतात. फुल टाईम सोशल वर्क !

म्हणजे नुसतं बायकाचं मेळावं, सभा, परिषदा आणि निवेदंन एवढंच करत्यात काय आनी काय ?

आता तुला काय सांगायचं ? अरे, त्या लेख लिहितात. चर्चासत्रातून निबंध वाचतात. शहरातल्या बायकांना जागृत करतात.

म्हणजे त्यांना शहरात बायकास्नी मुक्ती पायजे. खेडयात बायका गुलाम -हायल्या तर चालत्यात म्हणा की.

असं नाही. त्यांना सगळ्या स्त्रियांसाठी चळवळ करायचीय. म्हणून तर त्या आपल्याकडं आलेत.

मग मघाशी त्या तसं का बोलालत्या ? आणि त्यास्नी लईच काम करायची हुक्की आसंल तर त्या खेडयात का ईत न्हाईत. न्हाई तर आदिवासी भागात का जाईल न्हाईत.

सगळं पुणं-मुंबैच का ? अरे, त्या जिथं राहतात तिथंच त्या काम करणार. उगाच काहीही बोलू नको. पुण्या-मुंबईत ह्या बायका जागृत झाल्या म्हणून किमान त्या इथवर येऊ शकल्या. नाही तर काय ? आता आता त्यांची चळवळ आकार घेते आहे. उद्या ती अखंड मानवजातीची चळवळ होईल.

मला न्हाई वाटत. मला तर ती शहरातल्या बायकांची चळवळ वाटतीया."(पृ.२६०-२६१)

राजन गवस यांच्या 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यांमध्ये अनेक अनैतिक संबंध ठेवणा-या स्त्रियांचा उल्लेख आहे. उदा. सुली,शेवंताक्का, रत्नव्वा ,शेवंता, बायना, सत्त्वव्वा, कमळा, गोजाबाई , बेबी,सुली या स्त्रियांच्या अनैतिकतेमागे समाजाने केलेली त्यांची कुचंबणा व शोषण,उपजीविकेच्या,चरितार्थाच्या साधनांचा अभाव असे समाजातील दुटप्पीपणाचे अनेक घटक असल्याने राजन गवस त्याकडे नैतिक,अनैतिकतेच्या,रुढ

सांकेतिक चौकटीतून पाहण्यापेक्षा माणुसकीच्या नैतिकतेने पाहतात. परंतु प्रतिष्ठा,मोठेपणा,प्रसिध्दी आणि पैसा यासारख्या तकलादू सवंगतेसाठी जेव्हा एखादी स्त्री असे वर्तन करते तेव्हा रघूसारख्या लेखकाच्याजवळ असणा-या पात्रांव्दारे त्यासंबंधीचा निषेधात्मक भाव त्यातून प्रकट होतो.'कळप' मध्ये बायना रघूच्या आईला सांगते," मला तर काकू कव्वा कव्वा जीवच द्यावा असं वाटाय लागलंय." बायना वयनीच्या डोळ्यात पाणी. च्याआयला, आई एवढं समंजस समजूतदारपण आपल्याकडं नाहीच. तिनं तर बायनावयनीला सगळ्या गोष्टीचं परमिटच देऊन टाकलं. आपण हे समजूनच घेऊ शकत नाही. बायनावयनी विषयी आपल्याला नेमकं काय वाटतं ? (पृ. ३४१)

परंतु प्रतिष्ठा, मोठेपणा,प्रसिध्दी आणि पैसा यासारख्या तकलादू सवंगतेसाठी जेव्हा एखादी स्त्री असे वर्तन करते तेव्हा रघूसारख्या लेखकाच्याजवळ असणा-या पात्रांव्दारे त्यासंबंधीचा निषेधात्मक भाव त्यातून प्रकट होतो. अपर्णा संगवई सारखी कवयित्री आपल्या करिअरसाठी, प्रगतीसाठी असे अनैतिक संबंध ठेवते, हे पाहून रघूला त्याची चीड येते. त्याबद्दल रघू सांगतो,"नंतर आम्हाला आकाशवाणी असा बोर्ड असलेल्या मॅटॅडोरमध्ये बसवलं. तपकिरेही होतेच. गाडी कुठुन चाललीय कल्पना नव्हती. मध्ये एका हॉटेलजवळ मॅटॅडोर थांबली. जायदे येऊन बसले. मला एकदम धीर आला. पण ते जाऊन संगवईबाई शेजारी बसले. दोन चार मैल सलग गेल्यावर टुमदार मोठया इमारतीजवळ गाडी थांबली. शेतवडीत एकची एक इमारत कुंपणानं वेढलेली. जवळच उंचच्या उंच अँटीना. लांबलचक इमारतीला भला मोठा काचेचा दरवाजा. आम्ही जाताच उघडला. सगळीकडं स्मशान शांतता. येणारा जाणारा तोंडाला पट्टी बांधल्यासारखा. रेकॉर्डिंग रूम जवळच्या वेटिंग रूममध्ये सगळेच थांबलो. तपकिरेची पळापळ. नंतर संगवईबाई आणि तपकिरे रेकॉर्डिंग रूममध्ये गेले. जायदेनी मला कविता कशा वाचाव्यात ह्यावर लेक्चर दिलं. एक दोन कविता वाचून घेतल्या. मग कुठं बाहेर गेले.'बाई' रेकॉर्डिंग संपवून बाहेर आल्या. एकदम खूष. नंतर मला आत ढकललं. अर्ध्या तासानंतर बाहेर आलो तर संगवई, जायदे चिकटून बसलेले आणि अपर्णाबाईंचे केस विस्कटलेले."(पृ.१७३)

राजन गवस यांच्या कादंब-यातील स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा विचार करता लक्षात येते की राजन गवस यांच्या लेखनाचा प्रारंभ कथा,कवितेपासून झालेला असून त्यात ग्रामीण जीवनविश्व,अनुभवविश्व प्रकट झालेले आहे तसेच ग्रामीण पातळीवरील स्त्रियांचे जगणे, त्यांचे सुखदु:ख ही प्रकट झालेले आहे. पुढे जाता राजन गवस 'कादंबरी' या वाङ्.मय प्रकाराकडे वळले असले तरी त्यातून ही त्यांनी स्त्रियांचे चित्रण माणुसकीच्या भूमिकेतून केलेले दिसते.

## इ) शैक्षणिक दृष्टिकोन

राजन गवस यांच्या 'धिंगाणा','कळप','तणकट' या कादंबरीमध्ये महाराष्ट्रातील शैक्षणिक परिसर आलेला आहे. 'धिंगाणा' मधून शालेय,'कळप' आणि 'तणकट' मधून कॉलेजचे वातावरण चित्रित झालेले आहे. शैक्षणिक वातावरणात शिक्षक आणि विद्यार्थी हे दोन महत्त्वाचे घटक असतात. त्यांच्या परस्परसंबंधातून शैक्षणिक प्रक्रिया होत असते. गवस यांच्या या कादंब-यात विद्यार्थी आणि शिक्षक या दोन्ही घटकांच्या सहाय्याने, त्यांच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्राचे शैक्षणिक चित्र उभे झालेले आहे. पण एका अर्थाने ते स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे प्रातिनिधिक चित्रण ठरावे असे आहे. राजन गवस यांच्या कादंब-यातील या शैक्षणिक चित्रणात वास्तवता आलेली जाणवते.

भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर झपाटयाने शिक्षणाचा प्रसार झाला. खेडेगावात शिक्षण पोहचले आणि शहराकडे उच्च शिक्षणासाठी खेडेगावातील मुले येऊ लागली. या खेडयात राहणा-या मुलांची शहरातील साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रांशी ओळख झाली. शहरातील समाजकारण, राजकारण, अर्थकारण यामुळे या क्षेत्रात भयंकर भ्रष्टता वाढली. शिक्षणक्षेत्रातील या भ्रष्टतेची अनेकविध रुपे चित्रित केलेली दिसून येतात. ही भ्रष्टता केवळ शहरपातळीवर मर्यादित नसून ती निमशहरी,तालुकापातळीवरहीकार्यरत झालेली दिसते. निवडणुका,सत्ताकारण,नवनवीन उद्योगक्षेत्राने निर्माण होणारे बदलते अर्थकारण शिक्षणक्षेत्राशी लगटून येऊ लागले,किंबहुना ते त्यात घुसले आहे असे म्हणता येईल.

शैक्षणिक परिसराचा विचार करताना समाजाचे एक मोठे वर्तुळ कादंब-यात आलेले आहे. या शैक्षणिक पार्श्वभूमीचा विचार करताना तेथील परिसर, शाळा, कॉलेज मधील अभ्यासक्रम, तेथील परीक्षा पद्धती, शाळा, कॉलेज चालविणा-या संस्थाची भूमिका, तेथील शिक्षकांमध्ये असणारी मूल्यनिष्ठा यांचा ही विचार करणे महत्त्वाचे आहे. 'धिंगाणा','कळप' मध्ये शालेय परिसरात शिरलेल्या घाण, भ्रष्ट अशा वातावरणाचे चित्रण आलेले आहे. उदा.'धिंगाणा' मध्ये शाळेतील मुलांना देण्याचे दूध परस्पर बाहेर पाठवले जाते. ते पाहून चेअरमन म्हणतो, "खुळंच हाय ह्येच्या आयला. त्या काळू मास्तर विरूद्ध तक्रार केली. काय झालं? शिक्षणाधिका-यानं उपडली त्याची. लेका, साखळी असती त्येंची. उलट काळू मास्तर काल समोरनं आला. माझ्यासमोर आल्यावर मिश्या पिळाय लागला. काय झेटं झाली काय ? अशा डोळ्यानं बघाय लागला. पायताणानं मारल्यागत पुढं झालो. लांब जाईपर्यंत मागबी बघितलं नाही. आणि कांबळ्यावर तक्रार काय करणार ?' बाबल्यासमोर मी प्रश्न टाकला. बाबल्या थंडगार."(पृ. ६८)

गावातील शाळेत असणा-या शिक्षकांची अशिक्षकी वृत्ती व अनैतिकता यांचे अस्सल चित्रण त्यांच्या अनेक कादंब-यातून येते.

'कळप' मध्ये रघू ज्या शाळेत नोकरी करत असतो. तेथील भ्रष्ट वातावरण पाहून म्हणतो, "आमच्या शाळेतल्या नऊ मास्तरपैकी एकालाही पैसे द्यायच्या आधी नोकरी मिळालेली नाही. त्यामुळं मास्तर वर्गात जातात, पोरांना पुस्तकं उघडाय लावतात. वाचत बसा रे म्हणून खुर्चीत झोपून टाकतात. शिकवायचं झालंच तर काय करतात माहितीय, वर्गात जाऊन धडा वाचायचा आणि ओळी ओळीचा अर्थ सांगायचा. आता पुस्तकात छापलेल्या ओळींचा सरळ अर्थ सांगायला पगार देऊन मास्तरच कशाला पाहिजे ? परवा मी आमच्या सान्याचं म्हणजे मुख्याध्यापकाचं दहावीचं मराठीचं गाईड पळवलं. तर पठ्ठया तासभर बोंबलत होता. शेवटी तास घेतला नाहीच. दुस-या दिवशी नवं गाईड घेऊन आल्यावरच तास. मग मी आमच्या गावातल्या बाबल्याच्या भावाला गाईड देऊन टाकलं. हा आमचा मुख्याध्यापक. मग बाकीच्यांचं काय ? मागच्यावर्षी त्या चौगल्याविरूद्ध पोरं

तक्रार घेऊन आली. सर वर्गात सारखं सारखं सिग्रेटी ओढत बसतात. तर त्यानं उलटं पोरांनाच बदडून काढलं. अशा शाळा पहिजेतच कशाला ? वळू पोसायला ?
आप्पया म्हणाला, अशा लोकांना जोडयानं हाणलं पाहिजे."(पृ.२३६) तर 'धिंगाणा' मध्ये कांबळे मास्तर हा गावात मटका गोळा करायचे काम ही करत असतो. काळू मास्तर, कांबळे मास्तर विरूद्ध बाबल्या आणि त्याचे मित्र तक्रार करायचे ठरवतात.

त्याचप्रमाणे कॉलेजमध्ये शिक्षणापेक्षा अन्य प्रवृत्तींवर दिला जाणारा भर, शैक्षणिक संस्थांमध्ये वाढू लागलेले अशैक्षणिक वातावरण आपल्याला 'कळप'आणि 'तणकट' मध्ये दिसून येते. या कादंब-यामध्ये खेडेगावातून तालुक्याच्या ठिकाणी कॉलेजला येणारी मुले त्यांची आर्थिक परिस्थिती, नेत्यांच्या मुलाची दादागिरी, राजकीय लोकांद्वारे कॉलेजमध्ये चालविल्या जाणा-या चळवळी शिकवण्यांचा वाढता प्रभाव, कॉलेजमध्ये शिकवताना येऊ लागलेला यांत्रिकपणा, शिक्षकांची अ-नैतिक भूमिका, परीक्षेत होणारे गोंधळ, मोर्चे, ताणतणाव, मुलामुलींची प्रेम प्रकरणे इ. अनेक गोष्टी वास्तवस्वरुपात येतात. या सर्व गोष्टीतून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये वाढता विसंवाद पाहिला असता त्यामधून समाजजीवनावर होणा-या भयंकर परिणामांची सूचना सतत ध्वनित होत राहते. त्याबद्दल रघू म्हणतो, "लेको, माझा विद्यापीठावरचा होता-नव्हता तो सगळाच विश्वास उडाला. मला विद्यापीठाच्या पदवीची सुद्धा लाज वाटणार. चोरबाजार आहे सगळा चोरबाजार ! हे साले मला जर कंपलसरी इंग्रजीला पास करत असतील तर पेपर तपासणा-याला नागडा करून कॉलेजाकॉलेजात हिंडवला पाहिजे. रांडे फुक्ट पगार खातात."(पृ.२३५)

भ्रष्टता, नीतिमूल्यांचा -हास, शैक्षणिक क्षेत्रात सुरू झालेले निरर्थक चक्र आणि यातून निर्माण होणारी अ-नैतिक अशी पिढी असे भयंकर विदारक चित्र पाहून संपूर्ण भारताच्या शैक्षणिक संस्कृतीची लाज वाटावी,असे चित्र उभे राहते.

शैक्षणिक क्षेत्रात असलेल्या अ-नैतिक, भ्रष्ट वातावरणात नैतिकतेने राहणारा जगूच शकत नाही. शिक्षणक्षेत्रात शिकविण्याबाबत होऊ लागलेली यांत्रिकीकरणाची भावना ही ख-या विद्यार्थ्यांसाठी त्रासाची होते. 'तणकट' मध्ये "लॉजिकच्या तासाला सोरटेबाई

भयंकरच बोअर करायला सुरवात केली तेव्हा कबीरनं सरळ खिशातली डबी बाहेर काढून तंबाखू-चुन्याचा तोबरा भरला. आता कितीही बोअर करू बाई . त्यानं गच्च डोळे मिटून घेतले आणि बाई चे शब्द आपल्याला ऐकू येऊ नयेत अशी धडपड करायला सुरू केली. तंबाखूची तार जुळू लागली तशी त्याची धडपड सार्थ होऊ लागली. मग त्यानं खिडकीतून दिसणा-या बाभळीच्या झाडावर नजर एकाग्र केली. भलतेच कुरूप दिसत होते झाड. कशाही पसलेल्या फांद्या. कुठंतरी असणारी पानांची वर्दळ. बाकी सगळं काळंठिक्कर. फारच ओबडधोबड वाढलंय. झाडानं कसं सुंदर असलं पाहिजे. डौलदार. पण काही झाडं अशी असतात, त्याला कोण काय कारणार ?

तासाची बेल झाली आणि त्यानं सुस्कारा सोडला. वर्गाच्या बाहेर पडल्यावर खळखळून तोंड धुऊन घ्यावं म्हणून प्राचार्यांच्या कार्यालयाजवळच्या हौदाकडं तो निघाला."(पृ.२६)

सगळीकडेच शैक्षणिक वातावरणात अशैक्षणिकता वाढत चालली आहे. म्हणूनच रघूला हादरा बसतो तो सनमाडीकर, महाजनसर यांच्या कृतीने. "दिलावर म्हणाला, तुझा हा गांधी नंतरचा महात्मा म्हण किंवा कलंदर पानके म्हण, दोघेही मनोरूग्णच. त्यांना सायक्याट्रीस्टकडं घेऊन गेलं पाहिजे. जगातली प्रत्येक गोष्ट आपल्याच इशा-यानं झाली पाहिजे असं फक्त दोघांनाच वाटतं. एक गांज्या ओढणा-या माणसाला आणि दुस-या मनोरूग्ण माणसाला. ह्या लोकांना प्रसिद्धीची प्रत्येक गोष्ट करावी, आपणच लोकांच्यासमोर असावं, आपणच हुकमत गाजवावी असं जे वाटतं ते त्यांच्या मनोआजाराचं सूचक आहे. अशी माणसं अतृप्त असतात म्हणूनच ती विवेक गमावून बसतात. अभ्यासाला व्यक्ती म्हणून त्या चांगल्या आहेत. अशा लोकांना शेवटी ठार वेड लागण्याची जास्त शक्यता असते. तू असं का करत नाहीस ? ह्या माणसांची ही जी मनोरूग्ण अवस्था आहे ती नीट समजून घेऊन कादंबरीच्या फॉर्ममध्ये मांडायची. म्हणजे करायचं काहीच नाही फक्त ते जसे जगत आले तसेच फक्त शब्दात मांडायचं. मोठं काम होईल. जमलं तर ह्या नादाला लाग. त्यांना अन्य कशानं मारून काय उपयोग ? आपण आपल्या शक्तीनं त्यांना हुतात्मा करण्यातला प्रकार. त्यापेक्षा त्यांनी आयुष्यभर माणसं निरोधासारखी वापरली. आपण

त्यांना मांडणीसाठी वापरून माणसाच्या वर्तनप्रेरणा शोधायला काय हरकत ? सिरिअसली विचार करून बघ. कदाचित माझं मत तुला पटेल."(पृ.३८६-३८७) गवस यांच्या कादंबरीतील "गांधी नंतरचा महात्मा" हा शब्दप्रयोग वारंवार येतो. स्वातंत्र्योत्तर काळातील गांधी विचारांना आलेले हीनरुप,कोणत्याही क्षुद्र व्यक्तीने स्वत:ला महात्मा म्हणवून घेत त्याला दिलेले सवंग रुप व्यंगोक्तीने प्रकट करतो. तर कबीरला तेथील शिक्षकांची जातीयतेला महत्त्व देणारी वागणूक ही जाणवत असते. गंजेकर सारखे सवर्ण शिक्षक जातीयतेचे माध्यम करून दलित विद्यार्थ्यांना, शिक्षकांना त्रास देत असतात तर अवचित भालेराव, फणींद्र कांबळे सारखे जातीच्या नांवावर राजकारण खेळण्याचा प्रयत्न करत असतात.

'कळप' मध्ये सामाजिक, शैक्षणिक चळवळींच्या नांवावर विद्यार्थ्यांकडून कामे करून घेऊन स्वत:चा राजकीय स्वार्थ साधणारे सनमाडीकर, महाजनसारखे शिक्षकच विद्यार्थ्यांना अ-नैतिकतेच्या मार्गावर नेण्याचा प्रयत्न करतात. ते पाहून रघू म्हणतो, "आयुष्यातली तीन वर्षे तुमच्या नादानं फुक्क घातली. नको त्या हमाल्या केल्या. नेहमी दुटप्पी वागून फसवत गेला. त्याचं काय ? पहिलंच सांगायचं-महात्मा माझं दैवत आहे. तुम्ही येऊ नका. खरे, घातकी तुम्हीच. आणि तुमच्यापेक्षा गांधी नंतरचा महात्मा. नुस्ते घातकीच नव्हे तर समाजाचे वैरी !"(पृ. ३२०)

असाच अनुभव 'तणकट' मधील कबीरला येतो. फणींद्र कांबळे मध्ये हळूहळू बदल होऊ लागतो आणि ते सुद्धा जातीचे राजकारण करून स्वार्थ साधण्याच्या गोष्टी करतात. तेव्हा कबीरला वाटते, "फणींद्रसर फक्त सोयीचं बोलतात. म्हणे, आंबेडकर वाच. कशासाठी ? असं अर्धवटसारखं वागण्यासाठी ? ह्यांचाच काय तरी घोळ होतोय. जग कुठं चाललंय ? आपण कुठं जायला पाहिजे ह्याचं भान येण्यासाठी आंबेडकर वाच आसं सांगायची हिंमत नाही यांची. उलट म्हणतात, तुझंच चुकतंय. काय चुकतंय ? म्हणे मिळेल तिथं धक्का द्या. धक्का द्यायला किमान ताकद अंगात यावी, म्हणून काय कारणार काय नाही तुम्ही ? उगाच लागले आपले सांगायला, ठेचा म्हणे. ठेचता ठेचता ह्यात तुम्हीच संपून

जाणार. हे कसं कळत नाही ? सगळाच घोटाळा झालाय कुठं तरी. बाबासाहेब समजून घेण्यातच घोटाळा झालाय. पण सांगायचं कुणी कुणाला ? ऐकणार कोण ? त्यापेक्षा आपण ठरवलेलंच योग्य आहे. ते लाख सांगोत."(पृ.११६) महात्मा गांधी असोत अथवा आंबेडकर असो या सर्व महान व्यक्तींना विचारांना राजकारणाने कसे हलके,स्वार्थी व क्षुद्र रूप दिले आहे, हे गवस सतत अधोरेखित करतात.

शिक्षणाचे क्षेत्र हे परंपरेने अत्यंत पवित्र आणि नैतिक असते ही भावना चेअरमन, रघू आणि कबीरला जाणवत असते. परंतु ती कुठेच अस्तित्वात दिसत नाही. त्याला आपल्या शैक्षणिक संस्थामधील अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती कारणभूती आहेत. आपले नियोजित अभ्यासक्रम, परीक्षा या सदोष आहेत. त्यांचे योग्य असे आयोजन नसल्याचे ही या कादंब-यांत दाखविले आहे.

शाळा, कॉलेजमध्ये घेतल्या जाणा-या परीक्षा, त्यामध्ये होणारे घोटाळे, भ्रष्टाचार ही 'कळप', 'तणकट' मध्ये दिसून येतो. 'कळप' मध्ये रघूची त्याबद्दलची प्रतिक्रिया अशी असते. "मी ग्रॅज्युएट झालो. विद्यापीठाचा विजय असो.
गाईड लिहिणा-यांचा विजय असो.
पेपर तपासणा-यांचा विजय असो. बरंच काय तरी बरळत शंक-याला गाठला.
तर तो म्हणाला, आपण ग्रॅज्यूएट झालो म्हणजे काय झालो ?
मग मी सुरू केलं, चॅन्सलरचा बाप झालो,
व्ही.सी. चा आजा झालो.
प्राचार्याचा पणजा झालो.
तासाला बोअर करणा-या प्राध्यापकांचा खापरपणजा झालो."(पृ.३२२)

तसेच अभ्यासक्रमात होणारे गोंधळ त्याच्यामागे काही लोकांचा स्वार्थ ही असतो. कॉलेजची पुस्तके कशी तयार होतात. त्याबदृल ही 'कळप' मध्ये रघूची प्रतिक्रिया स्पष्ट आणि परखड आहे. या कादंब-यांतून गवस यांनी दाखवून दिले आहे की आपल्या चालत आलेल्या परीक्षा पद्धती, अभ्यासक्रम हा जुनाट झालेला असून काळाच्या मागे पडत गेलेला

आहे. तेव्हा काही स्वार्थी माणसांमुळेच त्यामध्ये अमूलाग्र बदल न करता त्यातल्या त्यात काहीसा बदल करून तसा अभ्यासक्रम मुलांवर लादला जात आहे. ज्याचा पुढील आयुष्यात त्यांना काहीच उपयोग होणार नाही. अशी अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धती मधील दृष्टिहीनता ही त्यातून जाणवत आहे.

किशोर सानप लिहितात, "महाराष्ट्रात जितक्या झपाटयाने शिक्षणाचा प्रसार होत गेला तितक्याच झपाटयाने सबंध महाराष्ट्रात शैक्षणिक संस्थांचे जाळे प्रसरत गेले. खेडोपाडी शिक्षणसंस्था निर्माण झाल्या. शैक्षणिक संस्थांची मान्यता सरकारी बाब असल्यामुळे आणि बहुजनांच्या राजकारण्यांची सरकारात वर्णी असल्यामुळे, राज्यकर्त्यांनी शिक्षणाचे राजकीय महत्त्व लक्षात घेऊन, स्वत:चे मतदार क्षेत्रात शैक्षणिक संस्था चालविण्यासाठी आणि आपल्या राजकारणाच्या उपयोगासाठी जी माणसे उपयोगी पडतील, अशा अडाणी लोकांच्या हातात संस्थांचे सूत्र-संचालन सोपवले. परिणामत: महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांतून ब्राह्मणांचे वर्चस्व कमी झाले. परंतु सबंध महाराष्ट्रभरच्या शैक्षणिक संस्थांत अनेक अपप्रवृत्तींनी धुडघुस घालायला सुरवात केली. हळूहळू शैक्षणिक संस्थांना जातीय अड्डयांचे स्वरूप प्राप्त होत गेले. अनेक राजकीय-जातीय-सामाजिक अशैक्षणिक प्रवृत्तींचा जिकडे तिकडे संचार सुरू झाला."(१६) त्याप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रात होऊ लागलेले स्थित्यंतर राजन गवस यांच्या 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट'मध्ये दिसून येतात. शैक्षणिक संस्था मधील संडलेपण दाखवताना 'कळप'आणि 'तणकट' मध्ये क्रमश: प्राचार्य, फडणीस बलुतेदार सारखे शिक्षक ('कळप') गंजेकर, अवचित भालेराव, फणींद्र कांबळे ('तणकट') दिसतात. शैक्षणिक संस्थांमध्ये अनेक प्रकारच्या भानगडी, जातीयवादी चळवळी परीक्षेमध्ये चालणारा गोंधळ, राजकीय नेत्यांशी जवळीक, त्यासाठी चालणारे घाणेरडे राजकारण, शिक्षकांचे चालणारे दुसरे - उद्योग - व्यवसाय, त्याच्या प्रचारासाठी विद्यार्थ्यांचा उपयोग करणे अशा विविध स्तरावर चालणा-या अ-नैतिक प्रवृत्ती ही आहेत. "समाजातून सर्व क्षेत्रातून वाहात आलेली घाण शिक्षणक्षेत्रात तर जमा झाली नाही ना ? अशी शंका यावी इतक्या शैक्षणिक संस्था किडल्या आहेत."(१७) त्यामुळेच या क्षेत्रात

आता नैतिकता बाळगणा–या लोकांची गरज असून त्यांच्याद्वारे या क्षेत्रात असलेली घाण बाहेर काढून फेकणे शक्य आहे. हेच गवस यांच्या कादंब–यातून सूचित केलेले दिसते. उदा. 'कळप' मध्ये रघू शंक–याच्या द्वारे चालणा–या महाजन सराच्या विरूद्धच्या प्रवृत्ती तसेच 'तणकट' मध्ये कबीर द्वारा गंजेकरांना दिले गेलेले स्पष्ट उत्तर यामधून हे सूचित केले जाते.

गवस यांच्या 'कळप' आणि 'तणकट' मधून दिसून येणारी महत्त्वाची बाब म्हणजे शिक्षकांची अ–नैतिकता. अशा या प्रवृत्तीमुळे या क्षेत्रात शैक्षणिक वातावरण निर्माण झालेले नाही. शैक्षणिक संस्था राजकीय प्रवृत्तींचे स्थळ झाले. तेथे अपप्रवृत्ती वाढीस लागल्या. शिक्षकाला समाजात विशेष स्थान असते. तो एक माणूस असला तरी त्याच्यावर विशेष अशा सामाजिक जबाबदा–या असतात. त्यासाठी त्याला नैतिक मूल्य स्वीकारून जीवन जगणे महत्त्वाचे असते. जेथे या नैतिक मूल्यांचा –हास होत असेल तेथे त्याला विरोधही करावा लागेल. रघू, कबीर यांना अ–नैतिक दृष्टी बाळगण्या–या शिक्षकांचा अनुभव आलेला आहे. शाळा, कॉलेजमध्ये अशा शिक्षकांमुळेच वातावरण बिघडत असते. हे लक्षात येते. शाळेत मुलांना न शिकविता झोप घेणारे, अन्य काम करणारे शिक्षक दिसून येतात तसेच कॉलेजमध्ये जातीयतेला प्रोत्साहन देणारे सामाजिक चळवळींच्या नांवावर राजकीय प्रवृत्ती करणारे शिक्षक असतात. त्यांचा विरोध रघू, कबीरकडून केला जातो.

नैतिक मूल्यांची विचार सरणी असलेले शिक्षक अत्यंत कमी प्रमाणात आहेत. कारण हे शिक्षक ज्या संस्थांमध्ये कार्य करत असतात. तेथे असलेल्या दहशतीच्या वातावरणात त्यांची नैतिकता टिकणे अवघड असते. सर्वत्र पसरलेल्या या घाणीच्या प्रवाहात एक होण्याची शक्यता वाढून जाते. शिक्षणाच्या क्षेत्रात शिरलेल्या या किडलेपणाबद्दल रघू सांगतो, "परीक्षा संपली तेव्हा वाटाय लागलं. आपण जास्ती अभ्यास केला नाही. हेच उत्तम झालं. जास्ती अभ्यास केला असता तरी एवढंच लिहिलं असतं. यापेक्षा जादा काय लिहिणार ? पाच प्रश्न प्रत्येक विषयाचे. त्यातले निम्मे न वाचताही लिहिता येतील असे. मग माझ्यासमोर मलळभूत प्रश्न निर्माण झाला ह्यासाठी कॉलेज तरी करायची काय गरज ?

कशाला काढली असतील एवढी कॉलेजं. त्यापेक्षा मॅट्रीक झालेल्या पोराला फक्त गाईडं पुरवावतीत आणि कॉलेजं बंद करून टाकावीत. फुक्कट पैशांचं मातेरं." (पृ.११८)

शिक्षणसंस्थांमध्ये वाढीस लागलेली ही घाण, त्याला साहाय्यभूत अशी किंबहुना या सा-या गोष्टींची मुळे एकमेकात इतकी खोलवर रुजलेली आहेत की त्यांच्यातून शिक्षणक्षेत्रात एक दुष्ट चक्र निर्माण झालेले आहे व परिणामतः अशा या आपल्या येथील शिक्षण पद्धती, शिक्षकांची न-नैतिकता, अयोग्य परीक्षा पद्धती ही आहे. असे राजन गवस यांना वाटते.

अशा या शिक्षणक्षेत्राबद्दल डॉ. किशोर सानप लिहितात, "ज्या शिक्षणाच्या क्षेत्रातून 'माणूस' घडण्याची प्रक्रिया चालते, तेच जर इतके घाणीचे साम्राज्य निर्माण करीत असेल तर समाजाचे स्वास्थ्य निरोगी राहूच शकणार नाही."(१८) हाच विचार गवस यांनी 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या कादंब-यातून व्यक्त केला आहे. त्यांच्या कादंब-यातील नायक यांना नैतिक मूल्यांना जपणारा समाज अपेक्षित आहे. त्याप्रमाणे स्वतः नैतिकता जपण्याचा प्रयत्न करीत असतात. तेथे इतर लोक अनैतिकतेने जगण्यात सार्थकता मानणारे दिसतात. राजन गवस यांच्या कादंब-यातून शिक्षण क्षेत्रात आलेली घाण, किडलेपण दाखविला गेला आहे. अशा अनैतिक वातावरणातूनच चेअरमन रघू आणि कबीर सारखे नैतिकतेच्या दिशा सूचित करणारी पात्रे आपल्या समोर येतात.

## ➢ संदर्भ ग्रंथ टीपा


१) सानप किशोर –मराठी कादंबरीतील नैतिकता– बजाज पब्लिकेशन्स,अमरावती– पहिली आवृत्ती १९९८–पृ.५

२) पाटणकर रा.भा.– सौंदर्यमीमांसा– कॉंटिनेंटल प्रकाशन,पुणे–दुसरी आवृत्ती,१९८१–पृ.३४५

३) नेमाडे भालचंद्र– टीकास्वयंवर– साकेत प्रकाशन,औरंगाबाद– पहिली आवृत्ती,१९९०–पृ.१६४

४) सानप किशोर –मराठी कादंबरीतील नैतिकता –पूर्वोक्त –पृ.६

५) नेमाडे भालचंद्र– पूर्वोक्त –पृ.१६४

६) सानप किशोर –भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी: एक चिकित्सा– साकेत प्रकाशन, औरंगाबाद – पहिली आवृत्ती १९९६–पृ.११४

७) नेमाडे भालचंद्र – चर्चा, नवशक्ती–पृ.३

८) कुलकर्णी अंजली–सत्याग्रही विचारधारा, जाने– १९९९–पृ.६९

९) सानप किशोर – मराठी कादंबरीतील नैतिकता – पूर्वोक्त – पृ.१३/१४

१०) नेमाडे भालचंद्र–कादंबरीकार आणि रूपाचे भान –नवभारत, सप्टें. २०००– पृ. २१

११) सानप किशोर– मराठी कादंबरीतील नैतिकता – पूर्वोक्त – पृ.७–८

१२) नेमाडे भालचंद्र– पूर्वोक्त – पृ.१६५/१६६

१३) नेमाडे भालचंद्र– पूर्वोक्त – पृ.७९

१४) नेमाडे भालचंद्र– पूर्वोक्त –पृ.८३

१५) सानप किशोर – मराठी कादंबरीतील नैतिकता – पूर्वोक्त – पृ. ११

१६) सानप किशोर–भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी: एक चिकित्सा – पूर्वोक्त –पृ. १३८

१७) सानप किशोर– भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी: एक चिकित्सा– पूर्वोक्त –पृ. १३८

१८) सानप किशोर– भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी: एक चिकित्सा–पूर्वोक्त – पृ. १४०